| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १२ वा | मंगळवार, दिनांक २४ मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## हिंदू, शीख व बौद्ध वगळता अन्य धर्मांतरितांना मागासवर्गीय दर्जा मिळणार नाही; सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर धर्मात धर्मांतर करणारी व्यक्ती अनुसूचित जाती दर्जासाठी पात्र ठरू शकत नाही, असा महत्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला. तसेच, 'धर्मांतर केलेली व्यक्ती अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत संरक्षणाचा दावा करू शकत नाही. केवळ हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तींनाच अनुसूचित जाती दर्जाचा दावा करण्याचा अधिकार आहे', असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



**खंडपीठाने काय निर्णय दिला?**

न्यायमूर्ती पी.के. मिश्रा आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने याबाबत निर्णय दिला आहे. भारतीय राज्यघटनेच्या (अनुसूचित जाती) आदेश, १९५० नुसार, केवळ हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तींनाच अनुसूचित जातीचे सदस्य मानले जाऊ शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. 'लाइव्ह लॉ'ने दिलेल्या वृत्तानुसार, चिंथडा आनंद नावाच्या एका पाद्रीने याबाबत दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दिला. आनंद यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या मे २०२५ च्या निकालाला आव्हान दिले होते. जातीय भेदभाव आणि छळाचा सामना करावा लागल्याचा आरोप आनंद यांनी याचिकेत केला होता.

**सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले स्पष्ट मत**

धर्मांतरित ख्रिश्चन व्यक्ती आता 'अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९' अंतर्गत तक्रार दाखल करू शकत नाही. एकद्या व्यक्तीने ख्रिश्चन धर्म स्वीकारला की, ती तांत्रिकदृष्ट्या अनुसूचित जातीची राहत नाही, त्यामुळे या विशेष कायद्याचे संरक्षण तिला मिळत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. धर्मांतर केल्यामुळे त्या व्यक्तीची मूळ सामाजिक ओळख (जातीचा दर्जा) कायदेशीररित्या संपुष्टात येते, कारण संबंधित धर्मांमध्ये (उदा. ख्रिश्चन धर्म) अधिकृतपणे जातिव्यवस्था मान्य नाही, असे कोर्टाने नमूद केले.

**आनंद यांनी काय आरोप केले होते?**

आनंद यांनी दाखल केलेल्या याचिकेत त्यांच्यावर अत्याचार झाल्याचा आरोप केला होता. आनंद आणि त्यांच्या कुटुंबियांना जातीच्या नावाखाली मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. यामुळे त्यांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कायद्या अंतर्गत दाद मागितल्याचे स्पष्टीकरण दिले. आंध्रप्रदेश उच्च न्यायालयात हे प्रकरण गेल्यानंतर न्यायालयाने आनंद यांच्या ख्रिश्चन धर्मात धर्मांतराचे कारण देत त्यांना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अंतर्गत संरक्षण मागण्याचा अधिकार गमावला असल्याचे एफआयआर रद्द करण्याचे आदेश दिले होते. यानंतर आनंद यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

## गुंतवणूकदारांना दिलासा!

### जप्त मालमत्तांच्या लिलावासाठी नवा कायदा; ६ महिन्यात निर्णय घेण्याचे बंधन – देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** विधिमंडळ कामकाजात आज विधानपरिषदेचे सदस्य उद्धव ठाकरे यांच्यासह ९ सदस्यांचा निरोप समारंभ पार पडणार आहे. तसेच उद्धव ठाकरे यांच्याविषयी निरोप समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून काय बोलले जाते याकडे लक्ष असणार आहे. तसेच आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात अशोक खरात प्रकरणावर सविस्तर बोलणार आहेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशा जप्त केलेल्या मालमत्तांबाबत सहा ते सात वर्षे निकाल लागत नाही त्यामुळे फसलेल्या गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत करण्यात दिरंगाई होत असल्याचं निष्पन्न होत आहे, त्यामुळे याबाबत स्वतंत्र कायदाच करण्यात येईल, याचा फायदा सर्व सामान्य नागरिकांना होणार आहे.

तसेच ज्यादा पैसे देण्याचं आमिष दाखवून पैसे लुबाडणाऱ्या कंपन्यांची जप्त केलेल्या मालमत्तांबाबत त्या लिलावासाठी खुल्या करण्यासाठी सहा महिन्यात न्यायालयांनी निर्णय घ्यावा यासाठी नवीन कायदा तयार करण्यात येत असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे. याबाबतचा मूळ प्रश्न हेमंत ओगले यांनी उपस्थित केला होता त्यावर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी माहिती दिली त्यात हस्तक्षेप करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे त्यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, राज्यात गेल्या पंधरा दिवसांत अवकाळी पावसामुळे तसेच गारपिटीमुळे पिके आणि फळबागांचं नुकसान झालं आहे त्यांचे पंचनामे सुरू आहेत, त्याचा आढावा घेऊन नुकसान भरपाई देण्यात येईल.

हाफकिनकडे असलेला DPT लस तयार करण्याचा स्टेन ही अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक जैव–संपत्ती आहे. याचे बाजारमूल्य शेकडो कोटी रुपये आहे. रिलायन्स लाईफ सायन्सेस या खाजगी कंपनीने प्रस्ताव दिल्यानंतर, कोणतीही विचारणा न करता हाफकिनने लगेच एर्ीशींळेप ेष खपींशीशीं मागवण्याची प्रक्रिया सुरू केली यावर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून आक्षेप घेतला.

हाफकिन ही संस्था स्वतः लस उत्पादनात सक्षम




असताना, १५०० कोटींचा हा मौल्यवान ठेवा खाजगी कंपनीच्या हातात का दिला जात आहे, असा सवाल विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

हाफकिन ही संस्था आजपर्यंत स्वस्तात लस निर्माण करते. जर खासगी कंपनीच्या हातात गोष्टी गेल्यास सामान्य नागरिकांना लस महाग दरात मिळण्याची शक्यता. यामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कमकुवत होईल.राज्याच्या मौल्यवान जैव–संपत्तीवर खाजगी कंपनीचे नियंत्रण हा धोका आहे अस वडेट्टीवार विधानसभेत म्हणाले.

त्यामुळे खाजगी कंपनीला स्टेन देण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी. हाफकिनला स्वतःचे उत्पादन वाढवण्यासाठी प्रोत्साहन आणि प्राधान्य द्यावे अशी भूमिका वडेट्टीवार यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून मांडली.

राज्यात अमली पदार्थांचा प्रश्न गंभीर आहे. हे अमली पदार्थ इतक्या मोठ्या प्रमाणात कुठून येतात? राज्यात ड्रग माफियांचं मोठं जाळं आहे आणि हे ड्रग माफिया राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीन करण्याचं काम करत आहेत. त्यामुळे हे ड्रग माफियांचं जाळं समूळ नष्ट करण्यासाठी शासनाची काय भूमिका राहणार आहे?

माझ्या मतदारसंघातून ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या असल्याची माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. मुलींचे ब्रेन वॉश केले जात आहे. मुलींच्या संरक्षणासाठी सरकारने काही उपाययोजना केल्या आहेत का? अशा पद्धतीने लहान मुलींचे अपहरण होत असेल तर ही गंभीर बाब आहे आणि शासनाने गंभीर निवेदन केले पाहिजे. या मुलींची शोध मोहीम राबवली पाहिजे. यांचे पालक मोठ्या विवंचनेत आहेत. शोध घेण्यासाठी स्पेशल टास्क फोर्स तयार करण्यात यावी, अशी विनंती वडेट्टीवार यांनी केली.

## कोल्हापूर महापालिका हद्द वाढीचा प्रस्ताव स्थानिक विरोधामुळेच आजवर होऊ शकला नाही– माधुरी मिसाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, कोल्हापूर महापालिका हद्द वाढीचा प्रस्ताव आजवर ऐतिहासिक ठरला आहे, स्थानिक विरोधामुळेच तो आजवर होऊ शकला नाही, त्यासाठी गठीत समितीने अनेक बैठका घेतल्या त्यातून कोल्हापूर क्षेत्रविकास प्राधिकरण निर्माण करण्यात आलं. आता हद्द वाढ प्रस्ताव नव्याने शासनाकडे सादर झाला आहे मात्र जनगणना प्रक्रियेत ती करता येईल का हे तपासून पाहिले जाईल, अशी माहिती मिसाळ यांनी दिली आहे. याबाबतची लक्षवेधी सूचना राजेश क्षीरसागर यांनी उपस्थित केली होती.



रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार

www.latursamachar.com

### प्रभात किरणे

जोडता हात,अहंकार
पडे गळून मागता क्षमा,
राग जाई वितळून घडे
चूक कळे,त्व मागा–
वी माफी तोच एक
जगी,सदा सर्वदा सुखी
–इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९१-९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



इराणच्या ऊर्जा प्रकल्पावर करण्यात येणारा हल्ला पाच दिवसासाठी स्थगित - ट्रम्प

### चिमटा दयाचा



लातूरच्या जि.प.
उद्यानात सकाळच्यावेळी
तरूण–तरूणींची
वर्दळ वाढली आहे !
बघणारे, डोळे बंद करून
चालताना दिसत आहेत!!
जबाबदारी असणाऱ्याचे डोळे
कधी उघडणार आहेत !!!

## लातूर ग्रामीण मधील काँग्रेस पदाधिकारी यांच्या निवडी जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी तसेच स्थानिक पातळीवर पक्षकार्य अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने विविध पदांवर काँग्रेस पक्षाच्या वतीने माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.नुतन पदाधिकारी यांना काँग्रेस भवन येथे नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

यामध्ये रेणापुर शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी श्री. नितीन अनुरथ मोटेगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा विचार करून ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच रेणापुर शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी श्री. रोहित गोविंद गिरी यांची निवड करण्यात आली असून, युवकांना पक्षाशी जोडण्याबरोबरच युवकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.



याचबरोबर मुरुड बु. शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी सौ. सारिकाताई निलेश फेरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महिला सक्षमीकरण, महिलांचे प्रश्न आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याच्या उद्देशाने ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या या नियुक्त्यांमुळे रेणापुर शहर व परिसरातील पक्ष संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होणार असून, सर्व घटकांना एकत्रित घेऊन पक्षविस्ताराला चालना मिळेल, असा विश्वास काँग्रेस पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. नवीन पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेनुसार प्रामाणिकपणे काम करून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यास आपण कटीबद्ध असल्याचे नुतन पदाधिकारी यांनी सांगितले आहे.

दरम्यान, या नियुक्त्यांचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभयदादा साळुंके, माजी जि प अध्यक्ष संतोष देशमुख, विलास साखर कारखान्याचे माजी व्हा चेअरमन रवींद्र काळे, महिला काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्षा शीलाताई पाटील राजूरकर, युवक काँग्रेसचे लोकसभा अध्यक्ष निलेश देशमुख, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे, रेणापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद कापसे, महिला काँग्रेस लातूर तालुका अध्यक्ष ज्योतीताई शिंदे, लातूर ग्रामीण विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष :विश्वजीत पाटील, जि.प. सदस्य दत्ता टेकाळे, लातूर पंचायत समिती उपसभापती महेश चव्हाण माजी युवक काँग्रेस अध्यक्ष लातूर ग्रामीण विधानसभा रघुनाथ शिंदे,नगर पंचायत रेणापूरचे गटनेते गजेंद्र चव्हाण, नगरसेवक सचिन मोठेगांवकर, पदम पाटील, अजय चक्रे, रहीम पठाण, केशव माने, ॲड महेश राजे, अवधूत कातळे, प्रदीप काळे, चेतन एकुरके, उमेश हुडे, शिवाजी अकनगिरे, भीमाशंकर कोरे, अमित पाटील, सुरज वंगाटे, ज्ञानेश्वर पाटील, रमेश राठोड, मदन पांचाळ आदींची उपस्थिती होती.

## शिक्षक हे मुलांवर सर्वात जास्त प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व असते : डॉ. शुक्ल

**लातूर/प्रतिनिधी :** सध्यस्थितीत मुले पालकांपेक्षा शिक्षकांसोबत जास्त वेळ असतात. त्यामुळे शिक्षकांकडून जी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जातात त्यांचा त्यांच्या जडणघडणीवर खूप मोठा प्रभाव पडत असतो. कारण शिक्षक हे मुलांवर सर्वात जास्त प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व असते, असे प्रतिपादन पुण्याचे ख्यातनाम बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांनी केले. सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च हॉस्पिताल व मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करणारी सेवाभावी संस्था सोसायटी फॉर वेलबेईंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन ( स्वर ) लातूरच्या वतीने येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर – कंचन सभागृहामध्ये लातुरातील विविध शाळांमधील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ’ विद्यार्थ्यांची मानसिकता–शिक्षकांना काय माहिती असायला हवे’ या विषयावरील कार्यशाळेत डॉ. शुक्ल मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अनिल जायभाय हे होते. यावेळी अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, डॉ. दिनेश पाटील, डॉ. मुग्धा पोतदार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. आजच्या स्पर्धेच्या युगात बदललेली मूल्यव्यवस्था, सामाजिक वातावरण, बदललेल्या पालकत्वाच्या संकल्पना, जागतिकीकरण, सोशल मिडिया व तंत्रज्ञानाचा वाढलेला वापर अशा अनेक कारणांमुळे शालेय विद्यार्थ्यांसमोरील मनोसामाजिक आव्हाने व समस्या वाढत चालल्या आहेत.

## पोलीस शेतकऱ्याच्या बांधावर, मोहिमेअंतर्गत ७ वर्षांपासून प्रलंबित असलेला जमीन वाद सामोपचाराने निकाली

### घनसरगाव येथे रेणापूर पोलीसांची थेट शेतात जाऊन मध्यस्थी – ५ अदखलपात्र गुन्हे व ६ अर्ज असलेले प्रकरण निकाली

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत ग्रामीण भागातील किरकोळ वाद त्वरित, शांततेत व सामोपचाराने सोडविण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण जिल्हाभरात राबविण्यात येत असलेल्या पोलिस शेतकऱ्याच्या बांधावर या अभिनव उपक्रमाला सातत्याने यश मिळत असून, दिनांक २३ मार्च २०२६ रोजी घनसरगाव (ता. रेणापूर) येथे अशाच एका दीर्घकालीन वादाचा यशस्वी तोडगा काढण्यात आला.

घनसरगाव येथील अर्जदार श्री. विलास शिवाजी आमनावर व गैरअर्जदार श्री. परमेश्वर आमनावर यांच्यामध्ये शेतीच्या बांधासंदर्भात मागील तब्बल सात वर्षांपासून वाद सुरू होता. या वादामुळे दोन्ही कुटुंबांमध्ये तणाव निर्माण झाला होता तसेच गावातील सामाजिक सलोख्यावर देखील त्याचा परिणाम होत होता. या कालावधीत दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुद्ध पोलीस स्टेशन रेणापूर येथे ५ अदखलपात्र गुन्हे (NC) व ६ अर्ज दाखल केले होते, ज्यामुळे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे बनले होते.

सदर प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक श्री सुधाकर देडेवव कर्मचारी यांनी पोलीस शेतकऱ्याच्या बांधावर या मोहिमेअंतर्गत थेट संबंधित शेतजमिनीवर भेट देऊन परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी गावचे पोलीस पाटील, स्थानिक प्रतिष्ठित नागरिक व दोन्ही पक्षांची उपस्थिती ठेवून सखोल चर्चा करण्यात आली. दोन्ही बाजूंचे म्हणणे संयमाने ऐकून घेऊन, त्यांना कायदेशीर बाबी तसेच सामाजिक परिणाम समजावून सांगण्यात आले.

पोलीसांच्या प्रभावी मध्यस्थीमुळे व स्थानिक नागरिकांच्या सहकार्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आणि अखेर परस्पर संमतीने हा सात वर्षांपासून प्रलंबित असलेला वाद सामोपचाराने मिटविण्यात यश आले. दोन्ही पक्षांनी भविष्यात कोणताही वाद न वाढविता शांततेत व सौहार्दाने राहण्याचे लेखी



व मौखिक आश्वासन दिले आहे.

या यशस्वी समेटामुळे केवळ दोन कुटुंबांमधील तणाव दूर झाला नसून, संपूर्ण गावात शांतता व एकोपा वाढण्यास मदत झाली आहे. पोलीस शेतकऱ्याच्या बांधावर या उपक्रमामुळे पोलीस व नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ होत असून, न्यायालयीन प्रक्रिया टाळून वेळ व खर्चाची बचत होत आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून अशा प्रकारच्या उपक्रमांद्वारे गावपातळीवरील वाद तात्काळ सोडवून सामाजिक सलोखा टिकविण्यास प्राधान्य दिले जात असून, नागरिकांनी देखील अशा उपक्रमांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।


# लातूर समाचार

## गॅस शिवाय शक्यच नाही?

स्वयंपाकाचा गॅस सध्याला मिळत आहे. जनतेत समाधानाचे वातावरण आहे. अनेकांनी घाबरून गॅस मिळत नाही किंवा ती आगावू आपल्याकडे आसावी म्हणून कांगवा केला जात आहे, सध्याला सर्वसाधारण जनतेची ओरड कमी झाली आहे. राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व्यापारी एलपीजीचा अतिरिक्त २० टक्के पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांनी दिली. केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय यांनी २१ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. आता २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त २० टक्के वाटप वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा पूर्वीच्या संकटपूर्व पातळीच्या सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग आणि दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. यासोबतच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. राज्यातील केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. प्रलंबित परवाने आपोआप नूतनीकरण झाल्याचे मानण्यात येणार असून, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच वारसांच्या नावे परवाने तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावांमध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी रास्तभाव दुकान चालविणाऱ्या दुकानदारांना किरकोळ केरोसिन परवानाधारक म्हणून मान्यता देऊन परवाना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २० मार्च २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासनपत्रान्वये या संदर्भातील कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्व निर्णयांमुळे राज्यातील इंधन पुरवठा व्यवस्थेला काही प्रमाणात गती मिळण्याची अपेक्षा असून, विशेषतः खाद्यव्यवसाय आणि लघुउद्योगांना याचा मोठा फायदा होणार असल्याचे मानले जात आहे. राज्यातील अनेक हॉटेल व्यवसायिकांनी रविवारी आपली दुकाने बंद ठेवून ते गावाला गेल्याचे समजते. हॉटेल बंद असल्याने एक तर ग्राहकांना खाद्यपदार्थ मिळले नाहीत दुसरे मोठे संकट म्हणजे हॉटेलमध्ये कामगारांना दररोज कामाचा पगार मिळतो तो मिळणार नाही कारण हॉटेल बंद असल्याने मालक पगार करणार नाहीत. हॉटेल व्यावसायिक हुशार असतात, ते व्यावसायावर कमाई केलेली असते. त्याना आपले दुकान बंद ठेवले तरी काही परिणाम होत नाही, आर्थिक मरण हे कामगाराचे होते. उघड सांगतात गॅस नसल्याने ही वेळ आली. कामगार भडकणार नाहीत. ते सर्व सरकारवर ढकलून देत आहेत. सरकारकडून गॅसचा पुरवठा नाही वास्तविक हॉटेल मालकाने पर्याय शोधला पाहिजे. काही तरी उपाय शोधला पाहिजे. सध्याला मार्ग शोधला जात नाही थेट दुकानदारी बंद ठेवली जात आहेत. यात त्रास कामागारांना होत आहे. त्यामुळे मुळात जी सवय लागली किंवा गॅसवरच आवलंबुन ठेवले हे योग्य ठरले नाही. पुर्वी काही हॉटेल मध्ये गॅसची व्यवस्था नव्हती. परवलंबी झाल्याचा हा परिणाम दिसून येत आहे. युद्धाची परिस्थिती आहे. गॅस मिळत नाही. सरकार मोठा प्रयत्न करीत आहे. व्यावसायिकांना गॅस पुरवठा करण्याचा प्रयत्न करीत आहे. हे चित्र उघड दिसून येत आहे. तरी ओरड होत आहे. वास्तविक व्यावसायिक गॅस सिलेंडर धारकांनी छोट्या प्रमाणात मध्यस्थ साधला पाहिजे. लाकडी चुल किंवा काही याला पर्याय आहेत का? पर्यायी शोधाची मानसिकता सध्याला दिसून येत नाही. धुर नको, तातडीने स्वयंपाक व्हावा. गरमागरम मिळावे अशी मानसिकता निर्माण झाली आहे. त्यामुळे स्वयंपाकाचा गॅस हा जीवनाश्यक बनला आहे. ज्वारीचे पिठ नसेल तर तांदुळ चालतील. भात शिकवुन खाता येईल. अन्न शिजविण्यासाठी गॅस आवश्यकच आहे. अनेकांची मोदी सरकार आल्यास सबसिडी सोडली मात्र गॅस वापराचे कमी झाले नाही. सध्याला युद्धजन्य स्थिती आहे. जहाजाद्वारे गॅस आणणे जीव मुठीत धरून काम करण्यासारखे आहे. तरी भारतात तीन जहाज सुखरूप दाखल झाले आहेत. एकीकडे महासत्ताधिश अमेरिका आहे. भारताने मानवतेच्या दृष्टिने इराणी नागरिकासाठी औषधाचे उपचारार्थ एक विमान पाठविले आहेत. मेडिकलची मदत केली आहे. कोणाच्याही दबावाला बळी न पडता इराणला मदत केली आहे. जो पर्यंत युद्ध समाप्त होणार नाही तो पर्यंत गॅसचा तुटवडा भासणार आहे. याला व्यावसायिक गॅस वापरकर्त्यांनी दम धरला पाहिजे. हाळू-हाळू पर्याय शोधला पाहिजे. आकस्मित संकट आहे. असे संकट येईल असे वाटले नव्हते. त्यामुळे गॅसची टंचाई आकस्मित संकट आहे. याला तोंड दिले पाहिजे. केंद्र व राज्य सरकार यातून मार्ग काढत आहे. अमेरिकेला नाराज करता येत नाही. इराणशी संबंध तोडता येत नाही. ईस्त्राईला दूर करता येत नाही. अशा तिहेरी संकटातून गॅसवर मात केली जात आहे. अजून इंधन टंचाई नाही. रशियाकडून अगोदरच इंधनाची खरेदी केली आहे. अमेरिकेच्या दबावाला झुकारून पंतप्रधान नरेंद्र मोदी संकट काळात योग्य मार्ग निवडत आहेत. त्यामुळे संकटावर सर्वांनी मिळून मात केली पाहिजे. हॉटेल व्यावसायिकांनी आपला व्यवसाय ठप्प करणे योग्य नाही. कामगाराचे हाल होणार आहेत. त्यांना आर्थिक मदतीची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे काही तरी पर्याय किंवा पुर्ण शटरडावुन करण्यापेक्षा पर्याय शोधून चालू ठेवणे आवश्यक आहे. सरकारने व्यावसायिक सिलेंडर बंद केले नाहीत. ते काही प्रमाणात देत आहे. घरगुती सिलेंडरवर लोड येवू नये म्हणून व्यावसायिक सिलेंडरवर कटोती होताना दिसून येत आहे. त्यामुळे हॉटेल व्यावसायीकांनी सबुरीने घेणे व यातून मार्ग काढणे आवश्यक आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात रंगणार ‘कलातीर्थ’२०२६ वार्षिक स्नेहसंमेलन

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष श्री.ललीतभाई शाह, उपाध्यक्ष श्री. रमेशकुमार राठी, सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष श्री. संजय बोरा यांच्या प्रेरणेतून दयानंद कला महाविद्यालयामध्ये कलातीर्थ वार्षिक स्नेहसंमेलन २४ व २५ मार्च रोजी संपन्न होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या स्नेहसंमेलनात विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २४ मार्च रोजी प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध कवयत्री गुंजन पाटील यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार आहे. तर २५ मार्च रोजी प्रमुख अतिथी श्री. राजन सरवदे (सुप्रसिद्ध लोककलावंत)व श्रीमती माधुरी आवाड (प्रसिद्ध नृत्यांगना, दूरदर्शन कलावंत) यांच्या उपस्थितीत स्नेहसंमेलनाचा समारोप होणार आहे. अशी माहिती दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्नेहसंमेलनाध्यक्ष डॉ. शिवाजी गायकवाड यांनी दिली.




प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व स्नेहसंमेलन प्रभारी डॉ. रमेश पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७ ते २३ मार्च रोजी महाविद्यालयामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पारंपारिक वेशभूषा, रांगोळी, मेहंदी, मूर्ती कला, फॅशन शो, एसएमएस, रील निर्मिती, फोटोग्राफी, पोस्टर प्रेझेंटेशन व न्यूज रिडिंग, वाद-विवाद, निबंध, काव्यवाचन, उस्फुर्त भाषण, वक्तृत्व, अंताक्षरी, स्वयंशासन दिन, आनंदनगरी याबरोबरच बुद्धिबळ, बॅडमिंटन, क्रिकेट या मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभागी होऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिके मिळवली.

२४ मार्च रोजीच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख अतिथी प्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या उपस्थितीत वार्षिक पारितोषिक वितरण होणार असून कार्यक्रमांची सुरुवात त्यांच्या सुप्रसिद्ध कवितांनी होणार आहे. त्यानंतर फोक ऑर्केस्ट्रा, तलवारबाजी, वैयक्तिक गीत, कव्वाली, गोंधळ, देशभक्तीपर नृत्य आणि महाराष्ट्राची लोकधारा इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. तसेच २५ मार्च रोजी श्री. राजन सरवदे व श्रीमती माधुरी आवाड यांच्या उपस्थीतीत कथ्थक, मूक अभिनय, कोळी नृत्य, स्किट, हॉलीवुड मॅशप नृत्य, पोवाडा, पाश्चात्य वैयक्तिक नृत्य, तांडव नृत्य, जलसा, मिमिक्री, हरियानवी ग्रुप, लावणी, पॅटरॉट्रीक डान्स व शेलापागोटे असे विविध कलागुणांचे सादरीकरण विद्यार्थी करणार आहेत.

राष्ट्रीय, राज्य, विद्यापीठ व शालेय बोर्ड स्तरावर प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना दयानंद शिक्षण संस्था, संस्थेचे पदाधिकारी, आजी/माजी प्राचार्य व प्राध्यापक यांच्यावतीने भरीव रोख रक्कम विद्यार्थ्यांना बक्षीस रूपाने दिली जाते. स्नेहसंमेलनाच्या दोन्ही दिवशी प्रमुख अतिथी व संमेलनाध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख, कार्यालयीन अधीक्षक यांच्या हस्ते वितरण केले जाणार आहे. स्नेहसंमेलन कलातीर्थ २०२६ साठी विविध समित्या गठीत केल्या असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कलातीर्थ वार्षिक स्नेहसंमेलन प्रभारी डॉ. रमेश पारवे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यावेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, सांस्कृतिक विभागप्रमुख तथा आय क्यु ए सी प्रमुख डॉ. संतोष पाटील, क्रीडा संचालक डॉ. नितेश स्वामी, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉ. शिवकुमार राऊतराव ,स्टाफ सचिव प्रा.सुरेश क्षीरसागर व कार्यालयीन अधीक्षक श्री.संजय व्यास तसेच विविध समित्याचे प्रमुख प्राध्यापक, प्राध्यापिका, कार्यालयीन कर्मचारी व सर्व सेवक स्नेहसंमेलनाचे उत्तम नियोजन करीत आहेत.

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव यांच्या पुढाकारातून शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्या पुढाकारातून लातूर शहरातील लेबर कॉलनी येथील श्री शिवाजी विद्यामंदिर, कोल्हे नगर येथील डॉ. जाकीर हुसेन उर्दू / मराठी शाळा, मंठाळे नगर येथील पीएम श्री सावित्रीबाई फुले महानगरपालिका शाळा क्रमांक ९ येथील शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वाटप करण्यात आले.



यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नगरसेवक किरण जाधव, श्री शिवाजी विद्यामंदिर हायस्कूलचे मुख्याध्यापक दिगंबर खामकर, डॉ.जाकीर हुसेन उर्दू/मराठी शाळेचे मुख्याध्यापक सिद्दिकी सर, पीएम श्री सावित्रीबाई फुले महानगरपालिका शाळा क्रमांक ९ चे मुख्याध्यापक शिवदास शिंदे, नगरसेवक मंगेश सोनकांबळे, नामदेव इगे, असलम शेख लक्ष्मीकांत मंठाळे, आकाश गायकवाड, शंकर रसाळ वसंत जाधव, आगलावे सर, सूर्यवंशी सर, कादरी सर, वाघमारे मॅडम, आबास सर, विलास केदार, माधवी तेलंग मॅडम, सोमनाथ तोटाळे आदीनाथ मगर आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी शालेय विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंगायत समाजाचे तुळजापूर येथील राज्यव्यापी अधिवेशन जीवनगौरव, समाजभुषण व अक्कमहादेवी पुरस्काराचेही वितरण



**लातूर/प्रतिनिधी :** लिंगायत महासंघ, शाखा धाराशिव जिल्ह्याच्यावतीने रविवार दि.२२ मार्च २०२६ रोजी त्रीमुर्ती मंगल कार्यालय, तुळजापूर येथे लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांच्या नेतृत्वाखाली लिंगायत समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन आयोजित करण्यात आल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील व लिंगायत महासंघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शंकरराव पाटील गुंजोटीकर यांनी सांगितले.

२२ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या अधिवेशनात एकूण ९ सत्र ठेवण्यात आले आहेत. महात्मा बसवेश्वरांच्या तत्वांची माहिती वचन, कायक, दासोह, अनुभवमंटप, आष्टावरण व इष्टलिंग यावर अनेक मान्यवर वक्ते मार्गदर्शन व प्रात्यक्षीके सादर करणार आहेत. याबरोबरच अक्कामहादेवी, चन्नबसवेश्वर, सिध्दरामेश्वर यांच्या जीवन चरित्रावर सविस्तर मार्गदर्शन होणार आहे.

या अधिवेशनाचे पहिले सत्र सकाळी ६.३० वाजता ५०० दाम्पत्यांच्या सामुहिक सहभागाने इष्टलिंग पुजा होणार असुन या पुजेला वैज्ञानिक दृष्टीकोनातून मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.अमरनाथ सोलपूरे - बिदर, डॉ.मन्मथ गताटे - निलंगा व अमृताताई बचाटे - तुळजापूर हे उपस्थित राहणार आहेत. तर दुसऱ्या वचनोत्सव सत्रात संगमेश्वर तवरखेडे बसवकल्याण हे मार्गदर्शन करणार आहेत.

तिसऱ्या सत्रात अक्कमहादेवीच्या चरित्रावर यशवंत गणेशकर सास्तुर हे मार्गदर्शन करणार आहेत. चौथ्या सत्रात सिध्दरामेश्वराच्या जीवन चरित्रावर सोलापूर येथील वक्ते श्री चन्नवीर भद्रेश्वर मठ हे मार्गदर्शन करणार आहेत. तर पाचव्या सत्रात चन्नबसवेश्वराच्या जीवनचरित्रावर नांदेड येथील वक्ते प्रा.आनंद कर्णे हे मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राचे उद्घाटन प्रा.प्रभाकर उदगीरे हे करणार आहेत.

तर सहाव्या सत्रात आष्टावरण या विषयावर मल्लिकार्जुन मुलगे सोलापूर हे मार्गदर्शन करणार आहेत. सातव्या सत्रात महात्मा बसवेश्वरांचे तत्व व मंगळवेढा येथील त्यांचे वास्तव्य या विषयावर महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूरचे माजी प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे हे मार्गदर्शन करणार आहेत. तर आठव्या सत्रात जाहीर महासभा होणार असुन या कार्यक्रमाचे उद्घाटन तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

या सभेत जीवनगौरव, समाजभुषण व अक्कमहादेवी पुरस्कार देवून अनेक मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच धाराशिव, लातूर व सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत निवडून आलेले नगराध्यक्ष, उपमहापौर, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी धाराशिव जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना आमंत्रीत करण्यात आले आहे. तरी लातूर जिल्ह्यातील समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील व धाराशिव लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव पाटील गुंजोटीकर व लिंगायत महासंघाचे लातूर जिल्हाध्यक्ष करीबसवेश्वर पाटील यांनी केले आहे.

# कोमट मिठाच्या पाण्यात पाय भिजवून कोणता आजार बरा होऊ शकतो? तज्ञांकडून जाणून घ्या

आपण अनेकदा ऐकले आहे की, कोमट पाण्यात काही मिनिंट पाय भिजत ठेवल्याने वेदना कमी होतात. हा उपाय सोपा वाटेल, पण त्याचे परिणाम अविश्वसनीयपणे फायदेशीर आहेत. कोमट पाण्यात पाय भिजवल्याने शरीराला आराम मिळतोच, शिवाय दिवसभराचा थकवाही कमी होतो. यामुळे रक्ताभिसरण सुधारते, ताण आणि थकवा कमी होतो. बरेच लोक झोपण्यापूर्वी हे करतात. तर चला कोमट पाण्यात काही मिनिंट पाय भिजत ठेवल्याने इतर कोणते फायदे होतात ते जाणून घेऊया.

**कोमट पाण्यात पाय भिजवण्याचे आरोग्य फायदे**

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या मते, कोमट पाण्यात पाय भिजवल्याने शरीराचे तापमान थोडे वाढते, ज्यामुळे ब्लड सर्कुलेशन सुधारते. तसंच पायांच्या नसांमधील ताण आणि वेदना कमी होऊ शकतात. बराच काळ उभे राहून काम करणाऱ्यांसाठी ही पद्धत उत्तम उपचार ठरू शकते. कोमट पाणी स्नायूंना आराम देतो आणि थकवा कमी करतो.

कोमट पाणी पाय आणि तळव्यांमधील रक्त प्रवाह सुधारते. यामुळे रक्तवाहिन्या उघडतात. जे लोक जास्त वेळ बसून किंवा उभे राहतात किंवा ज्यांचे रक्ताभिसरण खराब असते त्यांना विशेषत: फायदा होण्याची शक्यता असते. ब्लड सर्कुलेशन सुरळीत झाल्याने ताण कमी होतो. तसंच शरीरावरील सुजन कमी होऊ शकते. त्याचबरोबर हृदयाचे आरोग्य देखील सुरळीत राहते.

जर तुम्हाला दिवसभऱ्याचा थकवा जाणवत असेल किंवा सांधेदुखीचा त्रास होत असेल तर उबदार पाण्याने आंघोळ करणं एक उत्तम मार्ग असू शकते. उष्णता स्नायूंना आराम देते आणि कडक झालेले सांधे सैल करते, ज्यामुळे संधिवात किंवा प्लांटार फॅसिटायटिस ग्रस्त असलेल्यांसाठी ते विशेषत: उपयुक्त ठरते.

कोमट पाण्यात पाय भिजवणे सुरक्षित आहे का? हो, ही पद्धत पूर्णपणे सुरक्षित आणि फायदेशीर आहे, विशेषत: जर पाय सुजलेले किंवा दुखत असल्यास. त्याचबरोबर तणावामध्ये असल्यास कोमट पाण्यात पाय भिजत ठेवणे उत्तम आहे. यामुळे ताण कमी होण्यास देखील मदत होते. कारण पायाला विश्रांती दिल्यानंतर संपूर्ण शरीर रिलॉक्स होतं. कारण पाय शरीराचा पाया आहेत. जेव्हा पाय थकलेले असतात किंवा दुखत असतात, तेव्हा शरीर संतुलन राखण्यासाठी आणि चालण्यासाठी वेगळ्या पद्धतीने कार्य करते. ज्यामुळे सांधे आणि स्नायूंवर अधिक ताण येतो आणि संपूर्ण शरीरात वेदना आणि थकवा येतो. शिवाय, पायांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्याने इतर शारीरिक समस्या उद्भवू शकतात, म्हणून विश्रांती घेणे आणि पायांची काळजी घेणे हे एकूण आरोग्यासाठी आवश्यक आहे. जर हिवाळ्यात पाय थंड पडत असतील तर हा उपाय त्यांना उबदार ठेवण्यास आणि रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करू शकतो.

कोमट मिठाच्या पाण्यात पाय भिजवण्याचे काय फायदे आहेत? मीठ घातल्याने कोमट पाण्याची प्रभावीता वाढते. मिठातील मॅग्नेशियम आणि इतर खनिजे त्वचेला आराम देतात आणि जळजळ कमी करतात. ते डिटॉक्सिफिकेशनमध्ये देखील मदत करते. विशेषत: जर तुमच्या पायांना वास येत असेल किंवा सूज येत असेल तर मिठाचे पाणी हे कमी करण्यास मदत करू शकते. एप्सम मीठ किंवा रॉक मीठ वापरणे हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो.

ताप आल्यावर कोमट पाण्यात पाय भिजवले तर काय होते? कोमट पाण्यात पाय भिजवणे हा तापावरचा एक जुना घरगुती उपाय आहे. तो शरीराचे तापमान संतुलित करतो आणि हळूहळू ताप कमी करतो. यामुळे पायांमधील नसा सक्रिय होतात. शिवाय शरीराची ऊर्जा स्थिर होते. यामुळे पायांमधून उष्णता बाहेर पडण्यास आणि डोक्यातील उष्णता कमी होण्यास मदत होते. कपाळावर कोल्ड कॉम्प्रेस आणि पायांवर कोमट पाणी यांचे मिश्रण तापावर खूप प्रभावी आहे.

झोप चांगली: कोमट पाण्यात पाय भिजवल्याने चांगली झोप येते. अनेकांना निद्रानाशाच्या समस्येचा त्रास असतो. झोपण्यापूर्वी ९० मिनिटे आधी कोमट पाण्यात पाय भिजवल्याने शरीर थंड होते आणि त्वचा उबदार होते. कोमट पाण्यात पाय भिजवल्याने ताण कमी होतो आणि मेंदूमध्ये रक्ताभिसरण सुधारते. तथापि, पाण्याचे तापमान १०४ ते १०८ अंश फॅरेनहाइट दरम्यान असावे.

# उमेदच्या साथीने अन्नपूर्णा फूड ॲण्ड प्रॉडक्टस ची लक्षवेधी घौडदौड

व्यक्तीच्या क्षमतांना योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि संधींची साथ मिळाली तर तो स्वत:च्या यशस्वी वाटचालीतून, इतरांना प्रेरणा देणारा दिशादर्शक ठरणारा माईलस्टोन प्रवास करतो, याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ग्रामविकास विभागातंर्गत ग्रामीन जीवनोन्नती अभियानातून यशस्वी वाटचाल करणाऱ्या अनेक सेल्फमेड उद्योजिका, ज्यांना उद्योग क्षेत्राची, व्यवसायाची कुठलीही पार्श्वभूमी नसताना आज घडीला त्यातील किती तरी जणीचे उद्योग व्यवसाय हे लाखांच्या वर आर्थिक उलाढाल करत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील रेणापूरच्या मीराबाई स्वय सहायता संघ, संविधान महिला ग्रामसमूह, सिद्धिविनायक प्रभागसंघ, पाळज येथील इयत्ता १० वी नापास असलेल्या विशेष म्हणजे उद्योगाची कुठलीही पार्श्वभूमी नसलेल्या अन्नपूर्णा फूड अँड प्रॉडक्ट्सच्या सर्वेसर्वा सुनीता अशोक कावळे यांचा उद्योजिका म्हणून सुरु असलेला यशस्वी प्रवास प्रेरणादायी आणि अभिनंदनीय आहे.

सुनीता कावळे त्यांच्या अन्नपूर्णा फूड ॲण्ड प्रॉडक्स अंतर्गत ११ प्रकारची आवळ्याची उत्पादने बनवतात. त्यांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात केली ती फक्त ५०० रुपयाच्या भांडवलावर आणि आजघडीला अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस ९ लाखा रुपयांपर्यंतची उलाढाल करत आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे प्रतिकूल परिस्थितीत स्वावंलबनाचा मार्ग शोधण्याच्या धडपडीत आवळ्यासारख्या आरोग्यवर्धक फळातून खाद्य पदार्थ तयार करुन त्याच्या विक्रीतून काही करता येईल या विचाराने अवघ्या पाचशे रुपयात व्यवसाय करु पाहणाऱ्या सुनीता यांचा प्रवास सोपा नव्हता, कारण आर्थिक पाठबळ तर काही नव्हतेच मात्र त्यांच्या आत्मविश्वासाला पूरक पाठिंबा देणारे वातावरण ही घरात नव्हते उलट अवतीभवतीच्या महिलांकडूनही त्यांच्या या प्रयत्नांना टिकेच्या नजरेतून बघितल्या गेले, त्यांच्या धडपडीला गांभिर्याने घेतल्या गेले नाही, तर उलट त्यांना हे जमू शकणार नाही, असे म्हटले गेले, मात्र त्यांच्या मुलींने त्यांना प्रोत्साहन देत पाठिंबा दिल्याने त्या हिमतीने आपल्या व्यवसायात जम बसवण्यासाठी प्रयत्न करत राहिल्या.

आज अकरा प्रकारच्या पदार्थाची निर्मिती करणाऱ्या अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस्ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सुनीता यांनी २०१७ साली आवळ्यावर प्रक्रिया करून छोटेसे उत्पादन सुरू केले. गावात सहज मिळणाऱ्या कच्च्या मालावर आधारित आवळा कँडी, मुरंबा, चूर्ण, लोणचं इत्यादी पदार्थ बनवण्यास त्यांनी सुरवात केली. प्रत्येक गोष्ट त्यांनी स्वत:च्या हातांनी बनवली. या व्यवसायासाठी आवश्यक कच्चा माल असलेला आवळा आणण्यासाठी त्यांना बरीच मेहनत घ्यावी लागली, कधी कधी तर ५०, ६० कि.मी. लांबपर्यंत जाऊन आवळा आणण्यापासून ते तो वाळवणे, त्याच्यापासून उत्पादन तयार करण्यासाठीची सर्व मेहनत घेऊन तो तयार माल बाजारपेठेत विक्री करण्यापर्यतची सर्व प्रक्रिया पार पाडत पुढे जात असताना सुनीता यांना अनेक अडथळे, अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र तरी त्या जिद्दीने पुढे जात राहिल्या, त्यांच्या या संघर्षात त्या २०१९ मध्ये उमेद (एमएसआरएलएम) अभियानाच्या माध्यमातून जोडल्या गेल्या. याठिकाणी त्यांच्या उद्योग उभारणीच्या प्रयत्नांना व्यावसायिक कौशल्य देणारे ब्रँडिंग, पॅकेजिंग, मार्केटिंग याची उपयुक्त माहिती देणारे प्रशिक्षण मिळाले.

ग्रामविकास विभागाच्या मार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुनीता यांना विक्रमी विक्रीचा अविस्मरणीय अनुभव प्रत्यक्ष घेता आला, या प्रदर्शनात अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टसच्या उत्पादनांना ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला त्यातून सुनीता यांनी आपल्या उत्पादनांची थोडी थोडकी नव्हे तर थेट १२ लाख रुपयांची विक्री केली, रेणापूर तालुक्यातील छोट्याशा गावातून सुरु केलेल्या व्यवसायाच्या उत्पादनांची इतकी मोठी विक्री होणे हे त्यांचे मोठे यश होते, कारण या विक्रीतून त्यांचा आत्मविश्वास वृद्धीगंत होऊन उद्योगाचे नवीन दालन त्यांच्यासमोर खुले झाले. व्यापक स्वरुपातील बाजारपेठेची ओळख आणि प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अनुभव त्यांना पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणा देणारा आहे.

# कपडे काढून झोपणे आरोग्यासाठी अतिफायदेशीर



कपडे काढून झोपणे कसे फायदेशीर आहे

नग्न झोपणे नवीन नाही: अभ्यास

महत्त्वाचे मुद्दे

तज्ञ नग्न झोपणे ही एक निरोगी चाल मानतात कारण यामुळे शरीराचे तापमान नियमित होण्यास आणि लैंगिक जवळीक वाढण्यास मदत होते.

कपडे काढून झोपण्याचे फायदे

◆ रात्रीची चांगली झोप घेणे, जोडीदारांमधील शारीरिक संबंध सुधारणे अशा अनेक फायदेशीर कारणांमुळे प्रत्येकाला नग्न झोपण्याचे स्वातंत्र्य असते. याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? कपडे न घालता झोपणे सामान्यत: बऱ्याच जणांना सवय नसते, परंतु तज्ञांचे म्हणणे आहे की यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारण्यास, शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास, जोडीदारासोबत लैंगिक संबंध सुधारण्यास आणि वजन वाढण्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. अभ्यासानुसार असे दिसून आले आहे की हिवाळ्यात नग्न झोपणे रात्री लवकर झोप येण्यासाठी आणि निरोगी चयापचय राखण्यासाठी अत्यंत योग्य आहे. ज्यांना उष्णतेची आवड आहे, त्यांच्यासाठी नग्न झोपताना उबदार होणारे बेड ही आज बाजारात उपलब्ध आहेत, असे तज्ञांचे म्हणणे आहे.

झोपेशी संबंधित झोपेवर यूकेमध्ये २०२२ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात नग्न झोपण्याचे फायदे समोर आले आहेत. १५ हजार प्रौढ व्यक्तींवर करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात २० टक्के लोक नग्न झोपणे पसंत करतात. विशेष म्हणजे तरुणांनाच नव्हे तर प्रौढांनाही निर्वस्त्र झोपायला आवडते, याचा हा स्पष्ट पुरावा होता. सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी २६ टक्के लोक हे ६५ वर्षांवरील तर १७ टक्के १८ ते २४ वयोगटातील होते.

◆ कपडे काढून झोपणे कसे फायदेशीर आहे

शरीराचे तापमान नियंत्रित करणे आणि शरीराच्या प्रायव्हेट पार्ट्समध्ये इन्फेक्शन रोखणे हे नग्न झोपण्याचे काही फायदे आहेत, असे बंगळुरूच्या स्टर सीएमआयच्या इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजीचे प्रमुख सल्लागार डॉ. संजीव कुमार सांगतात. सुनील कुमार के. तथापि, त्याचे कोणतेही वैज्ञानिक मूल्यमापन नसल्यामुळे वैयक्तिकरित्या याची शिफारस केली जाऊ शकत नाही

दरम्यान, ब्रिटनस्थित चार्टर्ड फिजिओथेरपिस्ट आणि स्लीप एक्सपर्ट सॅमी मार्गो यांनी हॅपिएस्ट हेल्थशी ईमेल संभाषणात नग्न झोपण्याचे काही मजेदार आणि कमी ज्ञात फायदे सांगितले. त्यापैकी काहींना ब्रिटनच्या सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांनी मान्यताही दिली आहे.

शरीराचे तापमान नियंत्रित करते

नग्न झोपण्याचा एक मुख्य फायदा म्हणजे आपण आपल्या शरीराचे तापमान प्रभावीपणे नियंत्रित करू शकता. कपड्यांच्या अडथळ्याशिवाय शरीर रात्रीच्या तापमानाशी चांगले जुळवून घेऊ शकते. हे आपल्याला अखंड पणे झोपण्यास आणि मानसिक आणि शारीरिक ताण तणाव कमी करण्यास मदत करू शकते.

सहज झोप घेणे

शरीराचे तापमान झोपेच्या वेळेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. हे सर्केडियन लयशी गुंतागुंतीने संबंधित आहे, एक अंतर्गत घड्याळ जे झोपेच्या-जागे होण्याच्या चक्राचे नियमन करते. जेव्हा आपण नग्न झोपता तेव्हा शरीर थंड होते आणि मेंदूला सिग्नल देते की झोपण्याची वेळ आली आहे. त्यामुळे तुम्हाला सहज झोप येते. झोपेची गुणवत्ता सुधारते संशोधनात असे सूचित केले गेले आहे की नग्न झोपल्याने झोपेची गुणवत्ता सुधारू शकते. शरीर नैसर्गिकरित्या थंड होण्यास परवानगी देताना सखोल आणि पुनर्संचयित झोपेच्या चक्रांना प्रोत्साहित केले जाईल. याचा अर्थ असा की आपण अधिक ताजेतवाने उठू शकाल आणि दिवसभर उत्साही रा

त्वचेचे आरोग्य सुधारते

घाम आणि बॅक्टेरिया आपल्या कपड्यांना चिकटून राहतील.

**(क्रमश: उद्याच्या अंकात)**

# लसूण आणि मधाचे चमत्कारिक फायदे



◆ रोज सकाळी रिकाम्या पोटी सेवन करणे ठरते फायदेशीर तुम्हाला माहित आहे का की रोजच्या जेवणाची चव वाढवणारा लसूण खाल्याने अनेक चमत्कारिक फायदे होतात. लसनाप्रमाणे मधाचे सेवन देखील शरीरासाठी फायदेशीर ठरते. आयुर्वेदानुसार, जर तुम्ही वाढत्या कोलेस्ट्रॉलनं त्रस्त असाल तर लसणाच्या कच्च्या पाकळ्याचं सेवन करणं फायदेशीर मानलं जातं. लसणात 'एलिसिन' नावाचं गुणकारी घटक असतं. हे एक प्रकारचं नैसर्गिक प्रतिजैविक आणि अँटीऑक्सिडंट असून याचं सेवन केल्यानं शरीरातील रक्तभिसरण सुधारण्यास मदत होते. तसेच, यामुळे रक्तही जाड होत नाही. लसणामध्ये असलेलं सल्फर आणि इतर रसायने लसणाला बॅक्टेरियाविरोधी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे गुणधर्म प्रदान करतात.

तसेच, मध हा निसर्गाचा एक अनमोल ठेवा असून मधुमेह असलेल्या व्यक्तींवरही मधाचा फारसा परिणाम होत नाही. यामध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलिफेनोल्स हे दोन महत्त्वाचे अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे, शरीरा-तील खाज, लालसरपणा कमी होण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास मदत होते. मधामध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटीफंगल गुणधर्म विविध आजारांशी लढण्यासाठी अंत्यत उपयुक्त ठरतात.लसूण आणि मध या दोन्ही मिश्रणांना आपल्या शरीरासाठी अमृत मानलं जातं. हे दोन्ही मिश्रण श्वसनाचे आजार, संसर्ग, त्वचा रोग, हृदयविकार आणि पोटासंबधित समस्यांवर अत्यंत प्रभावी ठरतात. यामुळे सर्दी, खोकला आणि तापाची लक्षणे कमी होण्यास मदत होते. तसेच, रक्त पातळ होऊन 'स्ट्रोक'चा धोका कमी होतो.याबरोबरच उच्च रक्तदाब, संधिवात, दातदुखी आणि बद्धकोष्ठतेसाठीही हे अत्यंत गुणकारी मानलं जातं. त्यामुळे या दोन्ही मिश्रणाचं नियमितपणे सेवन करणं आपल्या शरीरासाठी अत्यंत गुणकारी मानले जाते.असे तयार करा लसूण आणि मधाचे चमत्कारिक मिश्रण :एका स्वच्छ काचेच्या बरणीत ताज्या लसणाच्या पाकळ्या सोलून टाका. त्यात शुद्ध मध घालून बरणी पूर्ण भरा. ५ ते ७ दिवस हे मिश्रण तसेच राहू द्या (मिश्रण छान मुरू द्या) त्यानंतर दररोज सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन करा.टीप: लहान मुले आणि गर्भवती महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच याचे सेवन करावे.

# ममतांची जनतेसाठी खैरात




आपल्या 'मोफत'च्या योजनांना कल्याणकारी म्हणायचे; पण इतर पक्षांच्या तशा योजनांची 'रेवडी संस्कृती' अशी खिल्ली उडवायची ही भाजपची वृत्ती आहे. ममता यांच्या खैरातीने भाजपची पंचाईत झाली आहे. चार राज्यांत होणार्या आगामी विधानसभा निवडणुकांत पश्चिम बंगालमधील निवडणूक जास्त लक्षवेधी ठरत आहे. येथे सत्ता मिळवण्यासाठी भाजप जिवाचे रान करत आहे, तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी सत्ता टिकवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत. प्रत्यक्ष मतदानाला एका महिन्यापेक्षा जास्त काळ असला तरी राज्यात राजकीय चुरस आधीच वाढली आहे. ममता बॅनर्जी यांनी नुकताच तृणमूल काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या बाबतीतही त्यांनी भाजपवर आघाडी घेतली आहे. जाहीरनाम्यास 'बंगाल साठी दीदींची १० वचने' अशा आशयाचे शीर्षक दिले आहे. महिला आणि युवक या वर्गांना आकर्षित करण्याचा हेतू त्यातून दिसतो. जाहीरनामा प्रसिद्ध करताना ममता यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यावर कोरडे ओढण्याची संधीही साधली. 'लक्ष्मी भांडार' योजनेतील रकमेत ५०० रुपयांची वाढ, बेरोजगार युवकांना दरमहा १५०० रुपये मदत, गरिबांना पक्की घरे, घरोघरी नळाने पाणी, नागरिकांच्या दारात आरोग्य सेवा अशी आश्वासने या जाहीरनाम्यात आहेत. कृषी क्षेत्रासाठी राज्याच्या अंदाजपत्रकात ३० हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यामुळे शेती व शेतकर्यांसाठी वेगळे आश्वासन दिसत नाही. आपल्या काळात राज्य देशातील सहावी अर्थव्यवस्था बनले आहे हे ममता यांनी आवर्जून सांगितले.


'राष्ट्रपती राजवट'?

पश्चिम बंगालमध्ये केंद्र सरकारने अघोषित राष्ट्रपती राजवट लादली आहे व निवडणुकीनंतर बंगाली जनतेचे नागरिकत्व हिरावून घेण्याचे कारस्थान रचले आहे, असे आरोप ममता यांनी केले आहेत. मतदानाच्या तारखा जाहीर झाल्यानंतर निवडणूक आयोगाने राज्यातील वरिष्ठ सनदी अधिकार्यांच्या केलेल्या बदल्या, तामिळनाडूचे माजी राज्यपाल आर. एन. रवी यांची राज्यपालपदी नेमणूक करणे, मतदार याद्यांची विशेष तीव्र पडताळणी; या घटनांचा त्यांच्या आरोपांना संदर्भ आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर व कोलकाता उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार ६० लाखांपेक्षा जास्त मतदारांची पात्रता ठरवण्यासाठी १९ अपील केंद्रे स्थापन करणे निवडणूक आयोगाला भाग पडले आहे. 'एस आय आर'मध्ये विशिष्ट समाजावर प्रप्रतिकूल परिणाम झाल्याचा दावा करताना ममता यांनी देशात घटना शिल्लक नसल्याचा आर–ोप केला.

गेल्या १५ वर्षांत अल्प संख्याक समाजासाठी अनेक योजना राबवल्याने तो वर्ग 'तृणमूल'चा पाठिराखा मानला जातो. आर्थिक दुर्बल गटातील युवती व महिला यांना 'लक्ष्मीर भांडार' योजनेतून मदत दिली जाते. अनुसूचित जाती व जमातीच्या महिलांना दरमहा १२०० रुपये व अन्य वर्गातील महिलांना १००० रुपये देण्याची ही योजना २०२१ मध्ये सुरु झाली. तिचा ममता यांना उपयोग झाला. त्या नंतर मध्य प्रदेश व महाराष्ट्रात भाजपच्या सरकारांनी तशी योजना आणली. मदतीची रक्कम वाढवल्याने महिलांची मते परत मिळण्याचा 'तृणमूल'चा होरा आहे. बेरोजगार युवकांना मदत देण्याची योजना नुकतीच सुरु झाली असली तरी त्यात ८४ लाख युवकांनी नाव नोंदवल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. ज्येष्ठ नागरिक, मध्यम वर्गीय नोकरदार, उद्योजक यांनाही खुष करण्यासाठी जाहीरनाम्यात योजना आहेतच.

एवढ्यावरच ममता थांबलेल्या नाहीत. गेल्या निवडणुकीत नंदीग्राममध्ये त्यांचे जुने सहकारी सुवेंदु अधिकारी यांनी ममता यांचा पराभव केला होता. त्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे सुवेंदु यांचे निकटवर्ती पवित्र कार यांना भाजप मधून तृणमूल मध्ये परत आणण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. सुवेंदु यांच्या विरोधात त्याच मतदार संघात पवित्र यांना उमेदवारी देताना भाजपची राजकीय खेळीची पद्धत ममता यांनी वापरली. कार फारसे महत्त्वाचे नाहीत असे म्हणून या पक्षांतराला कमी लेखण्याचा प्रयत्न भाजपने केला असला तरी, नंदीग्राममधील बरीच मते पुन्हा तृणमूलकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांची मतपेढी बनवण्याची भाजपची कल्पना ममता राबवत आहेत. त्यांनी जाहीर केलेली खैरात व कार यांच्या पक्षांतराचा काय उपयोग झाला ते निकालाच्या दिवशी कळेल.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



जगात कितीतरी मनोरूग्ण असे आहेत ज्यांना ते मानसिक आजारांची लक्षणे अनुभवताय याची कल्पनासुद्धा नसते. असाच एक आजार म्हणजे बायपोलर डिसॉर्डर. खरं तर मनात जसं येईल तसं वागणं हा माणसाचा मूळ स्वभावच असतो. मात्र त्यात चूक किंवा बरोबर हे समजून घेण्याची मानसिक क्षमता संपते तेव्हा त्याचे गंभीर मानसिक आजारात रूपांतर होते.बायपोलर डिसॉर्डरला मॅनिक डिप्रेशन असेही म्हणतात. ही अशी मानसिक स्थिती आहे **(क्रमश: उद्याच्या अंकात)**

## २ Joke — विनोद





गाणं

मित्र : बाळ रडतोय तर त्याला त्याच्या आईजवळ का देत नाही.

बाप : छे छे, नको, त्याला झोपविण्यासाठी ती गाणं म्हणेल!

## ३ Message — संदेश



hak se di to teri na-farat bhi sar ankho par.
khairat me to teri bahobbt bhi manzor nahi.

## ४ Thought — सुविचार



माझे संपूर्ण अध्यापन हे दोन शब्दांचे बनलेले आहे, ध्यान आणि प्रेम.


– ओशो

**संस्कृत सुभाषित**

**दान धर्मश्च विद्या च रुपं शीलं कुलं तथा।**
**सुखमायुर्यश्चैव नव गोप्यानि यत्नः।।**

अर्थ – दान, धर्म, विद्या, रूप, शील, कुल, आरोग्य, सुख आणि आयुष्य या नऊ गोष्टींचे रक्षण प्रयत्नपूर्वक केले पाहिजे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**

१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स–मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्रा.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रश्शावरील तवंग, कट

**उभे शब्द**

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख– चढता वा उतरता
४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा
५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र
८१. निर्माण झालेले अंतर

**आडवे उत्तर**

१.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतग-ाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

**उभे उत्तर**

१.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी




# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### हार्दिककडून कर्णधारपद काढून 'या' खेळाडूला द्या! माजी क्रिकेटरने दिला सल्ला

मुंबई–आयपीएलमध्ये कधीकाळी सर्वात खतरनाक समजल्या जाणाऱ्या मुंबई इंडियन्स संघाची स्पर्धेतील दहशत मागील काही दिवसांपासून कमी दिसतेय. दोन वर्षांपूर्वी मुंबई इंडियन्सच्या मॅनेजमेंटने रोहित शर्माला हटवून गुजरात टायटन्समधून ट्रेड केलेल्या हार्दिक पंड्याला आपल्या संघात घेतलं होतं. हा निर्णय हार्दिक आणि मॅनेजमेंटसाठी खूप चॅलेंजिंग ठरला, यावेळी नाराज झालेल्या फॅन्सनी त्याला खूप ट्रोल केलं. मागच्या सिजनमधे हार्दिक पंड्याच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सचा संघ प्लेऑफमध्ये क्वालिफाय करण्यात यशस्वी ठरला. मात्र ते फायनलपर्यंत मजल मारू शकले नाहीत. तेव्हा माजी सिलेक्टर आणि कर्णधाराने मुंबई इंडियन्सला एक सल्ला दिला आहे. कोणी दिला सल्ला? भारतीय संघाचे माजी सिलेक्टर एस श्रीकांतने आपल्या युट्युब चॅनलवर म्हटले की, 'त्यांना (मुंबई इंडियन्स) ला पुन्हा एकदा एकत्र मिळून एक योजना आखावी लागेल. फ्रँचायझीचे मालक आणि संघ व्यवस्थापन यांना, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्या यांच्यासोबत मिळून परिस्थिती सुधारण्यासाठी काम करावे लागेल. त्यांनी यावर्षी सूर्यकुमार यादवला संघाचं कर्णधारपद करण्यास सांगायला हवं होतं.

### केसरी स्पर्धेच्या वादामुळे सामान्य घरातील पैलवान भरडला जातोय- चंद्रहार पाटील

पुणे–महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीनं पुण्यातील वाघोली येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर यांनी महाराष्ट्र केसरी किताब पटकावला आहे. या स्पर्धेनंतर कुस्ती स्पर्धेचं आयोजन करणाऱ्या संघटनेचा वाद पुन्हा एकदा सुरू झाला. कोणती स्पर्धा खरी, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशातच यावर डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी या सगळ्या वादात महाराष्ट्र केसरी स्पर्धा राज्य सरकारनं भरवावी, अशी मागणी केली आहे.डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील म्हणाले, सन २०२२ पासून दोन्ही महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा वाद सुरू झाला आहे. तेव्हापासून मी आवाज उठवत आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्री यांना निवेदनदेखील दिलं होत. आत्ता तर अस कळतं की यंदाच्या वर्षी चार महाराष्ट्र केसरी होणार आहेत. पण, गेल्या ६० वर्षाची परंपरा आहे की, वर्षातून एकदाच महाराष्ट्र केसरी स्पर्धा होत असते. यावर्षी जर चार–चार महाराष्ट्र केसरी स्पर्धा होत असेल तर अनेक समस्या निर्माण होतील. केसरी स्पर्धेचं महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.''

### विदर्भाच्या पोऱ्याची अचानक आयपीएलमध्ये एन्ट्री!

**नागपूर**–आयपीएल २०२६ चा मोसम आता फक्त पाच दिवसांवर येऊन ठेपला आहे, पण त्याआधी आयपीएलला दुखापतींचं ग्रहण लागलं आहे. स्पर्धा सुरू व्हायच्या आधीपासूनच बरेच फास्ट बॉलर दुखापतींमुळे आयपीएलमधून बाहेर झाले आहेत, त्यामुळे नवीन फास्ट बॉलर शोधताना सर्व टीमची धावाधाव सुरू आहे. दुखापतींचा सगळ्यात जास्त फटका कोलकाता नाईट रायडर्सना (केकेआर) बसला आहे. केकेआरमधून फास्ट बॉलर आकाश दीप आणि हर्षित राणा बाहेर झाले आहेत. तर मथिशा पथिराणाही सुरूवातीच्या काही सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. आयपीएल लिलावामध्ये केकेआरने मुस्तफिजुर रहमानला विकत घेतलं, पण बांगलादेशी खेळाडूंना आयपीएल खेळण्यावर बंदी घातल्यामुळे मुस्तफिजुरही खेळू शकणार नाही. एका मागोमाग एक फास्ट बॉलर बाहेर होत असतानाच केकेआरने टीममध्ये विदर्भाचा खेळाडू सौरभ दुबेला टीममध्ये घेतलं आहे. आकाश दीपच्या जागी सौरभ दुबे केकेआरमध्ये आला आहे.

# आणखी बरीच कारकीर्द शिल्लक

## 'महाराष्ट्र केसरी' किताब विजेता हर्षवर्धन सदगीरचे मत

पुण्याच्या वाघोलीत दुसऱ्यांदा 'महाराष्ट्र केसरी' किताब पटकावल्यानंतर हर्षवर्धन सदगीरने आपल्या भविष्यातील नियोजनाबाबत माहिती दिली.
(छायाचित्र – हर्षवर्धन सदगीर खपी–रिंसीरा)



पुणे : दोनवेळा 'महाराष्ट्र केसरी' किताबाचा मानकरी ठरलो म्हणजे माझी कारकीर्द संपत नाही. माझ्यापुढे अजून बरीच मोठी कारकीर्द शिल्लक असल्याचे रविवारी वाघोली येथे दुसऱ्यांदा 'महाराष्ट्र केसरी' किताब पटकाविणारा मल्ल हर्षवर्धन सदगीर याने सांगितले.
''किताबी लढतीनंतर चाहत्यांच्या गराड्यात अडकल्यानंतर तालमीत पोहचण्यास उशीर झाल्यानंतरही सहकाऱ्यांनी केलेले स्वागत यामुळे आपण भारावून गेलो. किताबी लढतीत सराव सहकारी महेंद्र गायकवाड याच्यावर मात केल्याचे दुःख असले, तरी शेवटी खेळात कोण तरी एकच जण जिंकतो. या वेळी मी जिंकलो. भविष्यात महेंद्रदेखील हा किताब जिंकू शकतो,'' असेही हर्षवर्धन म्हणाला.
''महेंद्र चांगला मल्ल आहे. आम्ही दोघेही आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलात काका पवार यांच्याकडे मार्गदर्शन घेतो. त्यामुळे कुणीही जिंकले तरी आमच्या तालमीचे नाव मोठे होणार होते याचा अधिक आनंद आहे,'' असे हर्षवर्धनने सांगितले.
किताबी लढतीनंतर अनेक माध्यमातून हर्षवर्धन याने कुस्तीचा विजयी निरोप घेतल्याची चर्चा वाऱ्यासारखी पसरली होती. प्रत्यक्षात तसे काहीच नव्हते.
''दुसरे विजेतेपद आणि त्यामुळे झालेल्या आनंदाच्या भरात मी बोलून गेलो. माझा निवृत्तीचा विचार अजिबात नाही. माझ्याकडे अनुभव दांडगा असून, त्याचा उपयोग करून मला अजून खूप खेळायचे आहे,'' असे हर्षवर्धनने स्पष्ट केले. पहिल्या विजेतेपदानंतर मला शासनाकडून सेवेत सामवून घेतले जाईल अशी अपेक्षा होती. अनेक प्रयत्न केले. पण, ते फोल ठरले. मात्र, आता सरकारची भूमिका बदलली आहे. यशस्वी खेळाडूंना शासकीय सेवेत दाखल करून घेतले जाते. भविष्यात सरकारने शासकीय सेवेत रुजू होण्याचा प्रस्ताव ठेवल्यास नक्कीच स्वीकारेन, असे सांगून हर्षवर्धनला आता शासकीय नोकरीची गरज नसल्याच्या चर्चेला पूर्णविराम दिला.आपल्या शैलीविषयी बोलताना संयम राखून प्रतिस्पर्ध्याच्या नियोजनानुसार खेळणे आपल्याला अधिक आवडते, असे सांगून हर्षवर्धनने दोन वेळा 'महाराष्ट्र केसरी' किताब हा सर्वात मोठा क्षण असल्याचे सांगितले.
''राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर अनेक पदके मिळिवल्यानंतर आता आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याचे आपले स्वप्न आहे. करोनाच्या काळात संधी मिळाली होती. मात्र, तेव्हा स्पर्धाच रद्द झाल्यामुळे माझे स्वप्न अर्धवट राहिले. आता भविष्यात अधिक मेहनत करून हे स्वप्नही साकार करण्याचे उद्दिष्ट आपण ठेवले आहे,'' असे हर्षवर्धन म्हणाला.
तालमीत सहकाऱ्यांचा जल्लोष सुरू असतानाच उपस्थित असलेले गुरू काका पवार यांनी किताबी लढतीमधील दोन्ही मल्ल माझेच होते. याचा आनंद मला अधिक आहे. त्यामुळे एक जिंकला, दुसरा हरला याचे वाईट वाटण्यापेक्षा आपले मल्ल प्रगती करत आहेत याचा अभिमान वाटतो, असे सांगितले. ''हर्षवर्धन भावनेच्या भरात जेतेपद मिळिवल्यानंतर काही बोलून गेला. पण, तसे काही नाही. त्याला अजून खूप काही करायचे आहे. थोड्या विश्रांतीनंतर भविष्यातील नियोजन करायला सुरूवात करू. सध्या राज्यातील मल्लांना शासनाकडून अधिक भरीव मदत अपेक्षित आहे,'' असे काका पवार यांनी सांगितले.

### आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलाचा 'पाचवा महाराष्ट्र केसरी'

मल्ल म्हणून काका पवार दिवंगत हरिश्चंद्र बिराजदार यांच्या गोकुळ वस्ताद तालमीत आणि कडक शिस्तीत तयार झाले. तेव्हा ङ्कमहाराष्ट्र केसरीफ कुठला तर गोकुळ वस्ताद तालमीचा असे समीकरण जुळून आले होते. अनेक किताब विजेते मल्लांची परंपरा या तालमीने मिरवली. ही परंपरा बिराजदारांच्या पाश्चात त्यांचा पठ्ठा काका पवार यांनी सुरू ठेवली आहे. आतापर्यंत काका पवार यांच्या आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलाने पाच वेळा या किताबाचा मान मिळिवला आहे.

### २ वेळा महाराष्ट्र केसरी किताब तरी

दोनवेळा महाराष्ट्र केसरी किताबाचा मानकरी ठरलो म्हणजे माझी कारकीर्द संपत नाही. माझ्यापुढे अजून बरीच मोठी कारकीर्द शिल्लक असल्याचे रविवारी वाघोली येथे दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीफ किताब पटकाविणारा मल्ल हर्षवर्धन सदगीर याने सांगितले.

## ५ ट्रॉफी जिंकून सुद्धा मुंबई इंडियन्सच्या जर्सीवर ५ स्टार्स का नाहीत? कॅप्टन हार्दिक पंड्याने सांगितले कारण

मुंबई–इंडियन प्रीमियर लीगचा १९ वा सीजन येत्या शनिवार २८ मार्च पासून सुरु होणार आहे. तर आयपीएलमधील प्रसिद्ध संघ असलेला मुंबई इंडियन्स त्यांचा पहिला सामना हा रविवार २९ मार्च रोजी कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळेल. मुंबई इंडियन्स तर्फे त्यांच्या फॅन्ससाठी २१ आणि २२ मार्च रोजी जिओ वर्ल्ड ग्राउंड येथे मुंबई इंडियन्स फॅन फेस्टचं आयोजन करण्यात आलं होतं. यात चाहत्यांना त्यांच्या आवडत्या क्रिकेटरला भेटण्याची आणि संवाद साधण्याची संधी सुद्धा मिळाली. यावेळी कर्णधार हार्दिक पंड्या आणि कोच कायरन पोलार्ड यांची




संयुक्त मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीत हार्दिक पंड्याला मुंबई इंडियन्सने ५ ट्रॉफी जिंकून सुद्धा त्यांच्या जर्सीवर ५ स्टार्स का नाहीत? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर हार्दिकने दिलेल्या उत्तराने सर्वांचं मन जिंकलं.
जर्सीवर ५ स्टार्स का नाहीत?
मुंबई इंडियन्सने ५ ट्रॉफी जिंकून सुद्धा त्यांच्या जर्सीवर ५ स्टार्स का नाहीत? हा प्रश्न कर्णधार हार्दिक पंड्याला विचारण्यात आला. यावेळी हार्दिक म्हणाला की, 'मला वाटतं प्रामाणिकपणे सांगायचं तर आम्हा मुंबई इंडियन्स संघाला आयपीएलच्या जास्तीत जास्त ट्रॉफी जिंकायच्या आहेत. आम्ही खूप भाग्यवान आहोत की आमच्याकडे आधीच ५ ट्रॉफी आहेत. मग जर आणखी ट्रॉफी जिंकल्या आणि जर्सीवर पुढे स्टार्स करण्यासाठी जागा शिल्लक राहिली नाही, तर भविष्यात आपण काय टाकणार?'. हार्दिकच्या या उत्तराने फॅन्सचे मन जिंकले आणि त्यांनी एकच जल्लोष केला.आयपीएलमधील मुंबई इंडियन्सचा फॅनबेस खूप मोठा आहे.

## पाकिस्तानात आलात तर जोगवरच ठार मारू

मुंबई–पाकिस्तान सुपर लीग २०२६ चा मोसम सुरू होण्याआधीच स्पर्धेवर सुरक्षेचा धोका निर्माण झाला आहे. पाकिस्तानमधील सक्रीय दहशतवादी संघटना तहरीक–ए–तालिबान पाकिस्तान चा गट जमात–उल–अहरारने परदेशी खेळाडूंना धमकी दिली आहे. तुमच्या देशाच्या खेळाडूंना पाकिस्तानमध्ये पाठवू नका, असा थेट इशारा या संघटनेने दिला आहे. खेळाडूंसोबत काही अनुचित घटना घडली तर त्याची जबाबदारी आमची असणार नाही, अशी धमकी संघटनेच्या एका वरिष्ठ कमांडरने दिली आहे. कमांडरच्या नावाने ही धमकी सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

## सीनियरकडे दुर्लक्ष, अजिबात ऐकत नाही

### ॲटिट्यूडच वैभवला धोका देणार?

मुंबई–आयपीएल २०२६ सुरू व्हायला आता अवघे काही दिवस शिल्लक आ-हेत. आयपीएलच्या या मोसमात सगळ्यांचं लक्ष वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीकडे असेल. २७ मार्चला वैभव १५ वर्षांचा होणार आहे.
आयपीएलच्या मागच्या मोसमात पहिल्यांदाच खेळणाऱ्या वैभव सूर्यवंशीने धमाका केला होता. राजस्थान रॉयल्सकडून खेळताना वैभव सूर्यवंशीने गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात ३५ बॉलमध्ये शतक करून इतिहास घडवला.
आयपीएल २०२५ नंतर वैभव सूर्यवंशी ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड दौऱ्यावर गेला, तिथे इंडिया अंडर–१९ कडून खेळतानाही वैभवने उत्कृष्ट बॅटिंग केली. एवढंच नाही तर यावर्षी झालेल्या अंडर–१९ वर्ल्ड कपमध्ये वैभवने धुंवाधार बॅटिंग करून टीम इंडियाला ट्रॉफी जिंकवली.
आता आयपीएल २०२६ साठी वैभव सूर्यवंशी सज्ज झाला आहे, पण त्याआधीच वैभवच्या खेळापेक्षा त्याच्या वर्तनाची चर्चा सुरू झाली आहे. टीम इंडिया आणि आरसीबीचा क्रिकेटपटू जितेश शर्मा याने वैभव सूर्यवंशीच्या वर्तनाबद्दल महत्त्वाचं विधान केलं आहे. वैभव सूर्यवंशीकडे जगातल्या सर्वो




त्तम खेळाडूंना मागे टाकण्याची क्षमता आहे, पण मैदानाबाहेरच्या त्याच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह आहे, असं जितेश शर्मा म्हणाला आहे. वैभव सूर्यवंशी मागच्या वर्षी रायजिंग स्टार्स आशिया कपमध्ये जितेश शर्माच्या कॅप्टन्सीमध्ये खेळला होता.
'वैभव जगावर राज्य करू शकतो, त्याच्याकडे गियर नंबर ६ आहे, पण तो प्रोफेशनल नाही. आम्ही त्याला प्रोफेशनल बनवण्याचा प्रयत्न करत आहोत, पण तो पूर्णपणे प्रोफेशनल होईल, असं मला वाटत नाही. मैदानात तो वेगळा आहे, पण बाहेर... मी त्याला रात्री आईसक्रीमही न खाण्याचा सल्ला देतो', असं जितेश शर्मा म्हणाला आहे.
दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज माजी क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्स मात्र वैभव सूर्यवंशीच्या बॅटिंगने पूर्ण प्रभावित झाला आहे. वैभव परिपक्व आणि प्रोफेशनल आहे, असं एबी डिव्हिलियर्स म्हणाला आहे. अंडर–१९ वर्ल्ड कप फायनलमध्ये वैभवने १७५ रनची वादळी खेळी केली होती.

## श्रीलंकेच्या कॅप्टनचा पीएसएल ला ठेंगा, राजस्थान रॉयल्सला सॅम करनचा पर्याय मिळाला

नवी दिल्ली–आयपीएलच्या १९ व्या हंगामाला येत्या २८ मार्चपासून सुरुवात होणार आहे. यंदाच्या आयपीएलपूर्वी विविध संघांना खेळाडूंच्या दुखापतीमुळं फटका बसला आहे. राजस्थान रॉयल्सचा खेळाडू सॅम करन दुखापतीमुळं आयपीएलबाहेर गेला आहे. सॅम करनच्या जागी श्रीलंकेचा कर्णधार दासून शनाका खेळणार आहे. विशेष बाब म्हणजे दासून शनाका पाकिस्तान क्रिकेट लीग सोडून आयपीएलमध्ये दाखल होत आहे. राजस्थान रॉयल्सने दासून शनाका याला दोन कोटी रुपयांमध्ये संघात घेतलं आहे. श्रीलंकेसाठी दासून शनाका याने सहा कसोटी,७१ वनडे आणि १३१ टी–२० सामने खेळले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ३३५० धावा आहेत. तर, शनाका यानं ८६ विकेट घेतल्या आहेत. दासून शनाका यापूर्वी आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून खेळला आहे. राजस्थान रॉयल्सकडून तो पहिल्यांदा खेळणार आहे. राजस्थान रॉयल्सचा पहिला सामना ३० मार्चला गुवाहाटीमध्ये चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध होणार आहे.



राजस्थानकडून शनाकाची निवड का?
राजस्थानचा मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा श्रीलंकेचा आहे. तर, सहायक प्रशिक्षक विक्रम राठोड याने टी २० वर्ल्ड कप दरम्यान श्रीलंकेचे फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम केले. वर्ल्ड कपमध्ये दासून शनाका यानं दोन अर्धशतक केली होती.पीएसएल सोडून आयपीएलमध्ये दाखल
दासून शनाका हा डिसेंबर महिन्यात अबुधाबीत झालेल्या मिनी ऑक्शनमध्ये तो अनसोल्ड राहिला होता. त्यानंतर दासून शनाका हा पाकिस्तान क्रिकेट लीगमध्ये सहभागी झाला होता. जिथे त्याला लाहोर कलंदर्सने ७५ लाख पाकिस्तानी रुपयांना खरेदी केले होते. मात्र, आता दासून शनाका यानं पीएसलमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.
पाकिस्तान क्रिकेट लीगमधून दासून शनाकापूर्वी झिम्बाब्वेचा ब्लेसिंग मुजरबानी बाहेर पडला आहे. मुजरबानी यानं इस्लामाबाद यूनायटेड संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेत तो कोलकाता नाईट रायडर्समध्ये दाखल झाला आहे.

### एबी डिव्हिलियर्सशी असहमत ▶ १० लाख डॉलर्स गुंतवायला तयार

# वैभव सूर्यवंशी कधीच प्रोफेशनल होणार नाही, भारताच्या खेळाडूचा दावा

मुंबई–इंडियन प्रीमियर लीग २०२६ सुरू होण्यासाठी अवघे सहा दिवस शिल्लक असताना, सर्वांच्या नजरा ज्या खेळाडूवर असणार आहेत तो म्हणजे वैभव सूर्यवंशी. २७ मार्चला १५ वर्षांचा होणारा वैभवने मागील हंगामात ३५ चेंडूत शतक झळकावत सर्वांचं लक्ष वेधून घेतले होते. यानंतर आता तो आगामी हंगामासाठी संघात दाखल झाला आहे. स्पर्धेपूर्वी जितेश शर्माने त्याच्याबाबत केलेले वक्तव्य सध्या व्हायरल होत आहे.
गेल्या एका वर्षात सूर्यवंशीने ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडमध्ये शतकी खेळी करत जगभरात आपली छाप पाडली, तसेच अंडर–१९ विश्वचषक विजेत्या संघाचाही तो भाग होता.
मात्र आता खरी कसोटी काही दिवसांतच सुरू होणार आहे, कारण अनेक गोलंदाजांनी त्याची कमकुवत बाजू ओळखल्याची चर्चा असून, त्याला रोखण्यासाठी त्यांनी रणनीती आखल्याचं मानलं जात आहे.
कमी वयात अनेक विविध विक्रम आणि लक्षवेधी खेळी करणाऱ्या वैभव सूर्यवंशीचे भविष्य नक्कीच उज्ज्वल असणार आहे. मात्र जितेश शर्मच्या मते, एक गोष्ट अशी आहे जी कदाचित त्याच्यात पूर्णपणे विकसित होणार नाही, ती म्हणजे मप्रोफेशनलफ दृष्टिकोन.
रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा यष्टिरक्षक–फलंदाज जितेश शर्माच्या नेतृत्त्वाखाली आशिया कपमध्ये वैभव सूर्यवंशी खेळला होता, त्याने सांगितले की तो या तरुण खेळाडूसाठी एक दशलक्ष डॉलर गुंतवण्यास तयार आहे. मात्र जेव्हा एबी डिव्हिलियर्सने




सूर्यवंशीच्या कामगिरीबाबत विचारले, तेव्हा जितेश शर्माने वेगळी भूमिका घेतली. त्याच्या मते, मैदानाबाहेरील वर्तनात सूर्यवंशी कदाचित कधीच पूर्णपणे मप्रोफेशनलफ होणार नाही.
जितेश शर्मा वैभव सूर्यवंशीबाबत काय म्हणाला?



एका तरुण खेळाडूमध्ये मिलियन डॉलरची गुंतवणूक करायची असेल तर कोणाची निवड करशील, या प्रश्नावर उत्तर देताना जितेश शर्मा म्हणाला, मफ्आत्ताच्या घडीला वैभव सूर्यवंशी, मला वाटतं तो जागतिक क्रिकेटवर वर्चस्व गाजवू शकतो. त्याच्याकडे मगिअर नंबर ६फ आहे आणि त्याच्यामध्ये खूप कौशल्य आहेत.फ्फ
एबी डिव्हिलियर्सने वैभव सूर्यवंशीच्या खेळाचे कौतुक करत म्हटले, मफ्तो उत्कृष्ट खेळाडू आहे. मी त्याला अंडर–१९ स्पर्धेत पाहिले आहे. आयपीएल आणि मोठ्या क्रिकेटमध्ये प्रतिनिधीत्त्व केल्यानंतरही त्याच दर्जाचा खेळ कायम ठेवणे सोपे नसते. मात्र विश्वचषकात त्याने ज्या पद्धतीने कामगिरी केली, ती खूप प्रभावी होती. त्याच्या वयाच्या मानाने तो खूप प्रोफेशनल आहे.फ्फ
जितेश पुढे म्हणाला, मफ्मी त्याच्या खेळाबद्दल बोलतोय. त्याने आपला गेम प्लॅन कायम ठेवला. आयपीएलमध्ये जसा खेळला, तसाच खेळ तो पुढेही करत राहिला. स्वत:ला वेगळं दाखवण्याचा प्रयत्न केला नाही. गोलंदाजांविरुद्ध तो अहंकारीही झाला नाही. मात्र पुढे जाऊन तो नक्कीच अधिक प्रोफेशनल होईल.मात्र जितेश शर्माने एबी डिव्हिलियर्सच्या मप्रोफेशनलफ मताशी असहमती दर्शवली. मफ्तो प्रोफेशनल नाहीये, हे मी हे खात्रीने सांगू शकतो. सगळेच त्याला प्रोफेशनल बनवण्याचा प्रयत्न करत आहेत, पण मला वाटत नाही की तो कधी पूर्णपणे प्रोफेशनल बनेल. मैदानावर तो विक्रमांच्या चळती मांडेल पण मैदानाबाहेर तसे होणार नाही. मी माझ्या परीने त्याला सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. त्याला रात्री आईस्क्रीम खाऊ नकोस, असेही सांगावे लागते,फ्फ असे त्याने हसत सांगितले.

# सक्षम व सुजाण समाज निर्मितीसाठी वाचनाची सवय आवश्यक : धिरज देशमुख





**लातूर/प्रतिनिधी :** बदलत्या काळानुसार सक्षम व सर्वार्थाने समृद्ध समाज निर्माण करणे ही काळाची गरज बनली असून, यासाठी प्रत्येकाने विविध प्रकारचे साहित्य वाचनाची आवड जोपासावी, असे प्रतिपादन 'रीड लातूर' उपक्रमाचे संस्थापक धिरज विलासराव देशमुख यांनी केले.

बाभळगाव येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल वाटपाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

वाचन संस्कृती जोपासण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'रीड लातूर' या उपक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रकट वाचन, निबंध लेखन व काव्य वाचन स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना लातूर, औसा व रेणापूर तालुक्यातील सुमारे ९० जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती कौशल्याला वाव मिळत असून, वाचनाची आवड वृद्धिंगत होण्यासही मोठी मदत होत आहे. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर प्रमाणपत्र व मेडल प्रदान करून गौरविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बाभळगाव येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळा तसेच दयानंद प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सन्मान 'रीड लातूर' उपक्रमाचे संस्थापक धिरज विलासराव देशमुख व सौ. दीपशिखाताई धिरज देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी चि. वंश देशमुख व कु. दिवीयाना देशमुख यांचीही उपस्थिती होती.

गेल्या चार वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या 'रीड लातूर' उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. वाचनामुळे विचारांना दिशा मिळते, ज्ञान समृद्ध होते आणि जीवनाला योग्य आकार प्राप्त होतो. विविध प्रकारच्या पुस्तकांमधून मिळणारे ज्ञान आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर उपयुक्त ठरते. त्यामुळे सक्षम व सुजाण समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.तसेच, या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. लातूर जिल्ह्यातील शिक्षकांनी आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण केली असून, त्यांचे कार्य इतर जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी जीवनातील कोणत्याही आव्हानांपुढे न खचता धैर्याने सामोरे जावे, असा संदेश त्यांनी दिला.

या प्रसंगी सौ. दीपशिखाताई धिरज देशमुख यांनी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची " " ही प्रेरणादायी कविता विद्यार्थ्यांना वाचून दाखवली. या कवितेतून प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये मोठी स्वप्ने पाहण्याची जिद्द, आत्मविश्वास आणि उंच भरारी घेण्याची प्रेरणा जागवली जाते. 'मी उंच भरारी घेईन, माझ्या स्वप्नांना गवसणी घालीन' हा संदेश देत ही कविता विद्यार्थ्यांना स्वतःवर विश्वास ठेवण्यास आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यश मिळवण्यास प्रेरित करते. कठीण परिस्थितीतही हार न मानता सतत प्रयत्न करत राहण्याची शिकवण या कवितेतून दिली जाते. दीपशिखाताईंनी ही कविता सादर करत विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार आणि मोठे ध्येय ठेवण्याची प्रेरणा निर्माण केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती जोशी मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन 'रीड लातूर' उपक्रमाचे समन्वयक राजू सी. पाटील यांनी मानले.या कार्यक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव शाम देशमुख, आर. डी. गायकवाड, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंगायत समाजाचे प्रश्न महात्मा बसवेश्वर जयंती पुर्वी सोडवावेत-प्रा. सुदर्शनराव बिरादार

**लातूर/प्रतिनिधी :** लिंगायत महासंघ धाराशिव जिल्ह्याच्या वतीने रविवार दिनांक २२ मार्च रोजी तुळजापूरात लिंगायत समाज अधिवेशन आयोजित करण्यात आले होते या अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार सर म्हणाले की, लिंगायत समाजाचे प्रश्न महात्मा बसवेश्वर जयंती पुर्वी सोडवावेत.

ते पुढे बोलताना म्हणाले की, लिंगायत समाजातील वाणी नावाने कागदपत्रावर नोंद असणा-यांना ओबीसी चे आरक्षण लागू आहे.मात्र लिंगायत समाजातील लाखो समाज बांधवांच्या कागदपत्रांवर जातीची नोंद ही लिंगायत, हिंदू लिंगायत अशी असल्याने त्यांना ओबीसी चे आरक्षण लागू होत नाही.म्हणून या सरसकट लिंगायतांना ओबीसीचे आरक्षण लागू करण्यासाठी शासनाने शुद्धीपत्रक काढावे अशी मागणी केली.

तसेच मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वरांच्या राष्ट्रीय स्मारकाचे काम लवकर सुरू करावे. ओबीसी महामंडळाच्या अंतर्गत महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ निर्माण करण्यात आले आहे.ते महाराष्ट्र सरकारच्या वित्त विभागा कडे द्यावे.या महामंडळाद्वारे सरसकट लिंगायतांना कर्ज देण्यात यावे.व ओबीसीची अट ठेऊ नये तसेच लिंगायत मुलांना दहा लाखांपर्यंत विनातक्रार व विनातारण कर्ज देण्यात यावे.

तसेच सरसकट लिंगायतांना ओबीसी आरक्षण मिळेपर्यंत लिंगायत मुलांना, विद्यार्थ्यांना ओबीसींच्या सोयी सवलती देण्यात याव्यात.या सर्व मागण्या महात्मा बसवेश्वर जयंती पुर्वी सोडवाव्यात व लिंगायत समाजाला न्याय द्यावा अशी मागणी , तसेच लिंगायत समाजाला गाव तिथे स्मशानभूमीचा शासनाचा जी आर असुनही समाजाला स्मशानभूमी मिळत नाही.अशी मागणी असणा-या गावात प्रशासनाने स्मशानभूमी मिळण्यासाठी सहकार्य करावे अशीही मागणी सरकारकडे त्यांनी केली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अधिवेशनात उपस्थित असलेले उमरगा मतदार संघाचे आमदार प्रवीण स्वामी म्हणाले , लिंगायत समाजाच्या मागण्या संदर्भात आम्ही मुख्यमंत्री महोदयांकडे पाठपुरावा करु.समाजाच्या प्रश्नावर मी समाजाच्या सोबत आहे.बिरादार सरांच्या मागण्या रास्त आहेत.त्या महात्मा बसवेश्वर जयंती पुर्वी कशा सोडवता येतील याचा प्रयत्न मी व माझे सहकारी आमदारांना सोबत घेऊन या बाबतीत सर्व सहकार्य करु . यावेळी शि भ.प.शिवराज नावंदे गुरुजी,प्रा प्रभाकर उदगीरचे सर, प्राचार्य डॉ सोमनाथ रोडे, डॉ अमरनाथ सोलापूरे, डॉ.मन्मथ गताटे,प्रा आनंद कर्णे, मल्लिकार्जुन मुलगे,चन्नवीरभद्रेश्वर मठ,आदींचे विविध सत्रात भाषणे झाली.

यावेळी माधवराव पटणे ज्येष्ठ उद्योजक नांदेड यांना व जवळगा येथिल सेवानिवृत्त प्राचार्य डॉ रामलिंग मुळे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तर समाजभूषण पुरस्कार देऊन नवी मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर शशिकांत बिराजदार, धाराशिव जीपचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील हाडोंगरीकर, सोलापूरचे ज्येष्ठ उद्योजक सुरेश हत्ती, मंगलनाथ मल्टीस्टेट माजलगावचे कार्यकारी संचालक श्री रवींद्र कानडे, भारत लिब्राल एज्युकेशन सोसायटी उदगीर चे अध्यक्ष श्री उमेश पाटील, जालना येथील प्रा.बसवराज कोरे, अहमदपूरचे गणेश गुळवे, प्रा.आनंद कर्णे, डॉ. ओमप्रकाश कदम, शेषराव मानकरी देवणी, नरेंद्र गिरवलकर, श्रीमंत कावळे, सिद्धेश्वर केसरी ऋषी बोमणे, छोटा खेळाडू प्रथम नागलगावे, सौ शुभांगी सचिन दर्गो पाटील सोलापूर ,डॉ वसंतराव लवंगे, कन्नड मराठी अभिनेत्री समीक्षा उपाध्ये गुलबर्गा तसेच श्वेता बसैय्यै , लातूर येथील जय भवानी नर्सरी च्या संचालिका सुवर्णा मनोज उळागड्डे ,गुरप्पा शेटकार गुंजोटी,आदींना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील, प्रदेश सहसचिव विश्वनाथ मिटकरी, लिंगायत महासंघाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष चंद्रकांतअण्णा रमण शेट्टी, शहराध्यक्ष शिवानंद धुत्तरगी, सोलापूर लिंगायत महासंघाचे जिल्हा संघटक डॉक्टर वसंतराव लवंगे, लिंगायत महासंघाचे लातूर जिल्हा अध्यक्ष करीबसवेश्वर पाटील, धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष शंकरराव पाटील गुंजोटीकर, लिंगायत महासंघाचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष शेषराव मानकरी तानाजी पाटील भडीकर ,शिवाजी भातमोडे , गणेश पटणे , अमृता बचाटे, वैशाली होणाळे , चंद्रकांत डांगे अशोक काडादी,सुभाष शंकरे, शिवकुमार होळदांडगे, चंद्रकांत शिरसे ,भीमाशंकर शेळके, राजकुमार मुर्गे,,शंकर धुळशेट्टे, सविता खिंडे ,शिवकांत गंगापुरे, दत्तूशिंग वांगवाड, प्रा. अनिल करंजे, रामचंद्र दादा आलूरे, विवेक कोरे, महादेव आप्पा मिटकरी ,महादेवप्पा तोडकरी, नितीनजी मस्के, शिवराज सप्रे बेळंब, भावना आचवले, शिवराज शेटकार, वैजनाथ जट्टे, दत्ता बिराजदार, विजयकुमार कुडुंबले , शंकर जट्टे, संगमेश्वर स्वामी, यांच्यासह अनेक मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# 'जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६' करिता अर्ज सादर करण्याचे आवाहन- १० एप्रिलपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने शासन निर्णय १२ नोव्हेंबर, २०१३ अन्वये जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक, युवतींना व नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी दिला जातो.

युवक, युवतीसाठी पुरस्काराचे स्वरुप गौरव पत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये १० हजार व संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये ५० हजार असे आहे.

यासाठी जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांकडून जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ वर्षाच्या युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० एप्रिल २०२६ अशी आहे. यासाठीचे अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावेत व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात क्रीडाधिकारी बाबासाहेब इंगोले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा क्रिडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजतर्फे स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर यांच्यातर्फे पी. एम. श्री. सावित्रीबाई फुले म. न. पा. शाळा क्र. ९, लातूर येथे "हर घर दुर्गा" या स्वसंरक्षण जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विशेषतः मुलींमध्ये, वैयक्तिक सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना मूलभूत स्वसंरक्षण कौशल्ये देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

सदर शिबिरामध्ये प्रशिक्षित मार्गदर्शक मास्टर धनश्री मदने हिने स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून विविध तंत्रे आत्मसात केली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. शाळा प्रशासनानेही या उपक्रमासाठी सहकार्य केले. सदर कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. शिंदे, प्रा. महेश मानके, डॉ. ऐश्वर्या इर्लापल्ले, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

या उल्लेखनीय उपक्रमाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.

# चटकदार पदार्थांनी गजबजली 'आनंदनगरी'; हजारोंची उलाढाल

## खरेदी-विक्रीचे धडे प्रत्यक्षात; दयानंद महाविद्यालयात स्नेहसंमेलन उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात उत्कर्ष २०२६ वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या "आनंदनगरी" या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉल्समुळे परिसरात चविष्ट आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांनी हजारो रुपयांची उलाढाल करत व्यवहारज्ञानाची प्रात्यक्षिक शिकवण घेतली. हा उपक्रम सोमवारी मोठ्या उत्साहात महाविद्यालय परिसरात पार पडला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, पावभाजी, दहीधपाटे, दहीवडा, आईसगोळा, मठ्ठा, शरबत, बासुंदी, कुल्फी यांसारख्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. आकर्षक सादरीकरण, ग्राहकांशी संवाद आणि विक्री कौशल्य यामुळे प्रत्येक स्टॉलवर मोठी गर्दी पाहायला मिळाली. या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान आणि आत्मविश्वास मिळतो, असे मत व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्यासह उपप्राचार्य तथा विद्यार्थी परिषदेचे प्रमुख डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, बीसीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते, प्रा. ऋतुजा देशमुख, डॉ. सुभाष मोरे तसेच "आनंदनगरी"चे प्रमुख डॉ. विशाल वर्मा यांची उपस्थिती होती. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. विशाल वर्मा, डॉ. प्रिया वर्मा, प्रा. निकिता अग्रवाल, प्रा.अक्षय राजूरवार, प्रा.सोनाली सास्तुरकर, प्रा. रेणुका महाळंगीकर यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**'आनंदनगरी'ची वैशिष्ट्ये**

- विद्यार्थ्यांनी स्वतः उभारले खाद्यपदार्थांचे स्टॉल
- पाणीपुरीपासून कुल्फीपर्यंत विविध चटकदार पदार्थ
- हजारो रुपयांची उलाढाल; व्यवहारज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव
- ग्राहकांशी संवादातून विक्री कौशल्य विकसित
- स्नेहसंमेलनात आनंद व उत्साहाचे वातावरण
- एकूण २५ स्टॉल



# उदगीर तालुक्यात बेकायदेशीर जुगार अड्ड्यावर पोलिसांची मोठी धडक कारवाई : ११ जणाविरोधात गुन्हा दाखल; २३.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाने बेकायदेशीर जुगार व सट्टा व्यवसायाविरुद्ध सुरू केलेल्या विशेष मोहिमेंतर्गत पोलीस स्टेशन वाढवणा (बु), ता. उदगीर यांच्या पथकाने अत्यंत धाडसी व नियोजनबद्ध कारवाई करत मौजे मन्ना (उमरगा) शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून मोठा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर कारवाईत ११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी काही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे तर उर्वरित आरोपी फरार आहेत. या कारवाईत एकूण २३,४१,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे तसेच अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन वाढवणा (बु) चे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली.

लातूर जिल्ह्यात बेकायदेशीर जुगार व्यवसायावर आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत होते. त्याच अनुषंगाने दिनांक २२/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन वाढवणा (बु) येथील पथकास गोपनीय माहिती प्राप्त झाली की, मौजे मन्ना (उमरगा), ता. उदगीर येथील शिवारात संजय पाटील यांच्या शेताजवळील लिंबाच्या झाडाखाली काही इसम बेकायदेशीरपणे जुगार खेळत आहेत. सदर माहितीची खात्री करून पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाड टाकली. सुमारे दुपारी १५.१५ वाजण्याच्या सुमारास पोलीसांनी छापा टाकला असता आरोपी मंडळी तिर्रट नावाचा जुगार पत्त्यांच्या साहाय्याने खेळत व खेळवित असल्याचे आढळून आले.

सदर कारवाईत खालील व्यक्तींचा सहभाग आढळून आला
संभाजी (वय २८ वर्षे, रा. डाऊळ, ता. उदगीर)
२)शिवकांते (वय ३३ वर्षे, रा. खेर्डा, ता. उदगीर)
३)शिवकुमार (वय ३८ वर्षे, रा. टाकळी, ता. उदगीर)
४)लईकोद्दीन (वय ५२ वर्षे, रा. उदगीर)
५)विलास (वय ३५ वर्षे, रा. हाळी, ता. उदगीर)
६)ज्ञानेश्वर (वय २७ वर्षे, रा. निडेबन, ता. उदगीर)

९ फरार मध्ये अजित, बालाप्रसाद ऊर्फ प्रविण
३)गोविंद (रा. निडेबन)
४)पवन, रुषीकेश (रा. खेर्डा)
असे असून सदर कारवाईदरम्यान पोलीस पथकाने जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य (पत्ते, इतर साधने) रोख रक्कम : २१,५००/- जुगार ठिकाणी आढळलेली १० चारचाकी/दुचाकी वाहने (अंदाजे किंमत २३,२०,०००/-) असा एकूण २३,४१,५००/- जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन वाढवणा (बु) येथे गुन्हा क्रमांक ६९/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास कॐ/२१६ बळदे हे करीत आहेत.

सदर धाडसी कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुनील गायकवाड (पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी) पोलीस अंमलदार बळदे, शिवप्रताप रंगवाळ, यांनी केली आहे. सदर प्रकरणातील अटक आरोपींवर कायदेशीर कारवाई सुरू असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कार्यरत आहे.

## वाढत्या तापमानापासून संरक्षण करण्यासाठी वैद्यकिय अधिक्षक जितेन जैस्वाल यांचे जनतेला आवाहन

**चाकुर/अजगर मजकुरी :** काही दिवसांपासून चाकुर मध्ये उन्हाचा पारा सातत्याने वाढत आहे. वाढत्या उष्णतेमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन, वैद्यकिय अधिक्षक जितेन जैस्वाल यांनी जनतेला खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. 'उष्माघात' टाळण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.उन्हाळ्यात आरोग्याला जाणवणारे संभाव्य त्रास प्रचंड उष्णतेमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन खालील समस्या जाणवू शकतात: अतिसार (ऊळरींहशर) आणि उलट्या. चक्कर येणे किंवा प्रचंड थकवा जाणवणे. डोकेदुखी आणि अस्वस्थता. त्वचेला खाज येणे किंवा घामोळ्या होणे. उष्माघात: हा अत्यंत गंभीर प्रकार असून यात शरीराचे तापमान अचानक वाढते आणि रुग्ण बेशुद्ध पडू शकतो.



**काय करावे?**

भरपूर पाणी प्या: तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या. घराबाहेर पडताना काळजी: डोक्याला टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी सनग्लासेस वापरा. पेय पदार्थांचे सेवन: लिंबू सरबत, ताक, लस्सी, ओआरएस (जठड), नारळ पाणी आणि घरगुती नैसर्गिक पेयांचे सेवन वाढवा. पोशाख: हलके, सुती आणि पांढऱ्या रंगाचे कपडे वापरावेत. आहार, आहारात काकडी, टरबूज, द्राक्षे यांसारख्या पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या फळांचा समावेश करा.

**काय टाळावे?**

दुपारची वेळ: दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो कडक उन्हात बाहेर जाणे टाळा. व्यसने: मद्यपान, चहा, कॉफी आणि जास्त साखर असलेल्या पेयांचे सेवन टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी लवकर कमी होते. शिळे अन्न: उन्हाळ्यात अन्न लवकर खराब होते, त्यामुळे शिळे किंवा उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रमाची कामे: कडक उन्हात कष्टाची किंवा व्यायामाची कामे करणे टाळावे.

**उष्माघात झाल्यास करावयाच्या उपाययोजना**

जर एखाद्या व्यक्तीला उन्हाचा त्रास होऊन चक्कर आली किंवा बेशुद्ध पडल्यास: रुग्णाला तात्काळ सावलीत किंवा थंड ठिकाणी न्यावे. त्याच्या अंगावरील कपडे सैल करावेत. थंड पाण्याने शरीर पुसून काढावे (Ice Packs असल्यास मानेवर आणि काखेत ठेवावेत). रुग्ण शुद्धीवर असल्यास त्याला पाणी किंवा ओआरएस द्यावे. तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करावे.

लहान मुले, गरोदर महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी उष्णतेच्या लाटेत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. काहीही त्रास जाणवल्यास घरगुती उपाय करण्यापेक्षा डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## नळेगाव पीएम श्री कन्या प्रशाला प्राथमिक शाळेची शैक्षणिक सहल रवाना



**नळेगाव /अजगर मजकुरी :** नळेगाव येथील कन्या प्रशाला प्राथमिक शाळेचे शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांना ऐतिहासिक माहिती उपलब्ध व्हावी म्हणून सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीला जाताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साह जाणवत होता यावेळी मुख्याध्यापक संदिपान खोरे सहशिक्षक अंगत सावंत धोंडीराम जामगे मीनाताई डोंगरे मीनाताई मुंडे पल्लवी उटके सुरेखा बर शेट्टी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुंडा पाठवले सेवक सटवाजी काटवटे तसेच पालक अमीर पटवेकर प्रभाकर जोगदंड जयकुमार शृंगारे सुरेश धविले र जयवी वंजारे हमीद भाई तांबोळी वाहतूक नियंत्रक एमजी शेंडगे साहेब या सर्वांचे उपस्थित होते हे सहल सोलापूर तुळजापूर नळदुर्ग आवसा इत्यादी ठिकाणी जाणार आहे नळेगावा जनतेच्यावतीने अभिनंदन होत आहे.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

## लोकसहभागातून २०० गोमातांची होते सेवा

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय संस्कृतीमध्ये गोसेवेला अनन्यसाधारण महत्त्व असून शासनाने गायीला राजमाता दर्जा दिला आहे. याच श्रद्धेतून लातूर जवळील हरंगुळ येथील अपनी राधाकृष्ण गोशाळा प्रतिष्ठान ने गोसेवेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. रविवारी (२२ मार्च) प्रतिष्ठानच्या वतीने स्वतःची स्वतंत्र वेबसाईट आणि मोबाईल ॲप लॉंच करण्यात आले. गोशाळेच्या कामकाजात पारदर्शकता आणणारा आणि लोकसहभागातून चालणारा राज्यातील हा अशा प्रकारचा पहिलाच हायटेक प्रयोग असल्याचे सांगण्यात येत आहे.

## पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करून चोरीच्या गुन्ह्याचा तपास करून देतो म्हणून फसवणूक करणारा सराईत तोतया पोलीस जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेची कौशल्यपूर्ण कारवाई; ४.३० लाखांची रोख रक्कम जप्त, इतर गुन्ह्यांचा तपास सुरू



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाने, सामान्य नागरिकांची दिशाभूल करून स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करत फसवणूक करणाऱ्या एका सराईत व्यक्तीस अटक केले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या कारवाईत आरोपीकडून ४,३०,०००/- (चार लाख तीस हजार रुपये) इतकी रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, आरोपीकडून इतर जिल्ह्यांतील अशाच प्रकारच्या गुन्ह्यांचा तपास सुरू करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यात अलीकडील काळात काही फसवणुकीच्या घटना घडल्या होत्या. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा सक्रियपणे काम करीत होती.

दिनांक २३ मार्च २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक लातूर शहर परिसरात संशयितरित्या आरोपींचा शोध घेत असताना, माहिती प्राप्त झाली की, नवीन रेणापूर नाका, लातूर येथे एक इसम स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांची फसवणूक करीत आहे. ही माहिती खात्रीशीर असल्याने पोलिस पथकाने तात्काळ नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचून सायंकाळी १७.३० वाजण्याच्या सुमारास संशयित इसमास ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतलेल्या इसमाने आपले नाव विजय अनिरुद्ध कदम (वय २५ वर्षे), रा. पोस्ट कॉलनी, साई मंदिर जवळ, पेडगाव रोड, परभणी असे सांगितले. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ४,३०,०००/- रोख रक्कम मिळून आली. सदर रक्कम जप्त करण्यात आली आहे.

सखोल चौकशीदरम्यान सदरील व्यक्तींने अत्यंत धक्कादायक माहिती उघड केली की, वर्तमानपत्रातील चोरीच्या घटनांची माहिती गोळा करत असे. त्यानंतर संबंधित फिर्यादींचे मोबाईल क्रमांक मिळवून त्यांच्याशी संपर्क साधून स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचे सांगून स्वतःचा यूपीएससी परीक्षेच्या मुलाखतीला जाते वेळीचा व्हिडिओ दाखवून पोलीस अधिकारी असल्याची खात्री पटवत असे तसेच बनावट पंचनामा तयार करून त्यावर स्वतःचे नाव संदीप कदम सपोनी असे टाकून स्वतःची व फिर्यादीची सही घेत असे व चोरी गेलेला मुद्देमाल परत मिळवून देण्याचे आमिष दाखवत या बहाण्याने नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम उकळत असे. अहमदपूर येथील एका फिर्यादीस अशाच प्रकारे संपर्क करून मी पोलीस अधिकारी आहे, तुमचे चोरी गेलेले सोने परत मिळवून देतो असे सांगून दिनांक १९/०३/२०२६ रोजी ५,००,०००/- रक्कम फसवणूक करून घेतली. त्यापैकी ७०,०००/- आरोपीने खर्च केले असून उर्वरित ४,३०,०००/- रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे.

सदरील व्यक्तींने कबुली दिली आहे की, तो मागील दोन वर्षांपासून नांदेड व परभणी जिल्ह्यात अशाच प्रकारे फसवणूक करीत आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून आरोपीकडून इतर गुन्ह्यांची माहिती घेऊन संबंधित पोलीस ठाण्यांशी समन्वय साधून तपास सुरू करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन अहमदपूर, जि. लातूर येथे गुरनं १४२/२०२६ कलम ३१८(४), ३१६(२), ३१९(२) भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद नानासाहेब देशमुख,पोलीस अंमलदार संजय कांबळे, सुरेश कलमे, मोहन सुरवसे, राजेश कंचे, शैलेश सुडे, पाराजी पुटटेवाड, तुळशीराम बरुरे, महिला पोलिस अंमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

जप्त मुद्देमालासह पुढील तपासासाठी पोलीस स्टेशन अहमदपूर येथे हजर करण्यात आले आहे. प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की -कोणतीही व्यक्ती स्वतःला पोलीस अधिकारी आहे अशी खोटी ओळख देऊन पैसे मागत असल्यास त्वरित सतर्क व्हावे आणि अशी संशयास्पद व्यक्ती किंवा घटना आढळून आल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्ष अथवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे

## मार्च एन्डींग ..

घशाखाली उतरेना
रे चिंताग्रस्त कवळ
एकचं लागी ध्यास
येई वर्षाखेर जवळ

पूरीकरी कामे सारी
किती बुवा तळमळ
बीले पास ना झाली
मना मध्ये मळमळ

निधी जाणारं परत
पैसा भारी अवखळ
चिरीमिरी हाराकिरी
चिल्लरचीखळखळ

सगळ्यांना लागली
जनसेवेची कळकळ
दिस कमी सोंगेफार
भिती मनी चळचळ

फटाफटा आवरा गा
सुरु किती धावपळ
तत्पर सारे कर्मचारी
सुस्त करी पळापळ

वठलेली झाडे तरी
पाने करी सळसळ
निधी परत गेल्यावर
उपयोगी न हळहळ

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६